# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक १९ डिसेंबर २००८ रोजी (का.प. क्र.२०) संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

शुक्रवार दिनांक १९/१२/२००८ रोजी मा.महापौर सौ.विजया किशोर रहाटकर यांचे अध्यक्षतेखाली महापालिकेची सर्वसाधारण सभा महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे दु.४-३० वा.वंदेमातरम या गिताने सुरू झाली सभेला उपआयुक्त श्री.उध्दव घुगे नगरसचिव श्री.एम.ए.पठाण तसेच संबंधीत अधिकारी व खालीलप्रमाणे स.पालिका सदस्य उपस्थित होते.

०१. स.स.श्री.अब्दुल साजेद अब्दुल सत्तार
०२. स.स.श्री.बमणे पुनमचंद सोनाजी
०३. स.स.श्री.सुरे सीताराम इसराम
०४. स.स.श्री.ताठे भाऊसाहेब पुंडलिक
०५. स.स.श्री.नाहदी नासेर महमंद याहीया
०६. स.स.श्री.दाभाडे मिलींद यशवंत
०७. स.स.श्री.धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग
०८. स.स.श्री.जेम्स अंबिलढगे
०९. स.स.श्री.खान सलिम खान यासीन
१०. स.स.सौ.विजयाताई बनकर
११. स.स.श्री.जगताप संजय उत्तमराव
१२. स.स.श्रीमती मसरद बेगम शरफोद्दीन
१३. स.स.श्री.गायकवाड दिलीप नारायण
१४. स.स.श्री.माळवतकर महेश शिवाजीराव
१५. स.स.श्री.अत्तरदे प्रकाश सुका
१६. स.स.श्रीमती मिराताई रामराव शिंदे
१७. स.स.सौ.बेंद्रे विमल तुकाराम
१८. स.स.श्रीमती खान अजरा जबीन मसूद
१९. स.स.श्रीमती खान मेहरून्नीसा खान हमीद
२०. स.स.श्री.खान जावेद हसन कासीम हसन
२१. स.स.श्री.स.खुसरो बुऱ्हानोद्दीन
२२. स.स.श्री.अब्दुल रशीद खान (मामु)
२३. स.स.श्री.पाटील नरवडे वसंत पांडूरंग
२४. स.स.श्री.संजु रिडलॉन
२५. स.स.श्री.खान कैसर बद्रोद्दीन
२६. स.स.श्री.शेख इब्राहीम शेख इमाम
२७. स.स.श्री.हाजी शेर खान अ.रहेमान
२८. स.स.श्रीमती मुमताज बेगम वाहेद खान
२९. स.स.श्री.दत्ताभाऊ अण्णासाहेब पाथ्रीकर
३०. स.स.श्री.अशोक गोरखनाथ विरकर
३१. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष

३२. स.स.श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण
३३. स.स.श्री.अमोदी अबुबकर बिन सईद
३४. स.स.श्रीमती शेख शमशाद बेगम शेख हफिज
३५. स.स.सौ.पोळ सरला सखाराम
३६. स.स.श्री.डॉ.कराड भागवत किसनराव
३७. स.स.श्री.सावंत मधुकर दामोधर
३८. स.स.श्रीमती पाटणी हर्षमाला विजयकुमार
३९. स.स.डॉ.बिनवडे आशा उत्तमराव
४०. स.स.श्रीमती जयश्री किवळेकर
४१. स.स.श्रीमती सरिता ससाणे अशोक
४२. स.स.श्री.भगवान (बापु) देविदासराव घडमोडे
४३. स.स.श्री.कुचे नारायण तिलोकचंद
४४. स.स.श्रीमती शिंदे पुष्पा बाळू
४५. स.स.श्री.विसपुते शशांक दामोधर
४६. स.स.सौ.कोंडेकर अंजली दिलीप
४७. स.स.श्री.दाभाडे हिम्मतराव साळुबा
४८. स.स.श्री.ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग
४९. स.स.श्री.मोरे कचरू विश्वनाथ
५०. स.स.श्रीमती मोमीन सफिया फिरदोस अय्युब खान

**<u>नामनिर्देशित पालिका सदस्य</u>**

०१. स.स.श्री.संजय किसनराव केनेकर
०२. स.स.श्री.किशोर तुलशीबागवाले

**<u>चर्चा :</u>**

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :गेल्या २६ तारखेला मुंबईमध्ये अतिरेकी हल्ला झाला व त्यात पोलीस अधिकारी/शिपाई,जवान व निष्पाप नागरीकांवर हल्ला होवून त्यात ज्यांचा मृत्यू झाला अशा सर्व लोकांना या सभागृहाच्या वतीने श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

डॉ.भागवत कराड :यास माझे अनुमोदन आहे. या हल्ल्याचा निषेध म्हणून ठराव पारीत करावा.

श्री.मिलींद दाभाडे :भारताचे माजी पंतप्रधान स्व.व्ही.पी.सिंग यांचे वृध्दापकाळाने दुःखद निधन झाले त्यांना ही श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :या माझे अनुमोदन आहे.

श्रीमती मेहरून्नीसा खान:अगोदर चर्चा घेण्यात यावी.

श्री.सलीम खान :विकास कामाच्या संदर्भात चर्चा व्हावी.

श्री.सय्यद खुसरो :स्पील ओव्हरच्या कामाचे टेंडर झाले वर्क ऑर्डर देण्यात आल्या परंतू ती कामे का थांबविण्यात आली. खुलासा घेण्यात यावा.

मा.महापौर स्पील ओव्हरची मंजूर वार्डातील सर्व कामे सुरू करावी असे मागिल बैठकीत प्रशासनाला आदेशीत केलेले होते. वार्डात विकास कामे होत नाही सदस्यांची तक्रार येते कामे का सुरू झाली नाही याचा खुलासा करावा.

श्री.सय्यद खुसरो :माझे वार्डातील पेव्हर ब्लॉकचे काम का थांबविले श्री.सिकंदर अली यांचेकडून खुलासा घ्यावा.

उपअभियंता (स्लम) :पेव्हर ब्लॉकचे ४.५० लक्षचे काम झालेले असून पुढील काम करण्यासाठी मार्कआउट झाल्यानंतर सुरू होईल.

श्री.सय्यद खुसरो :किती वेळेस मार्क आउट करणार यासाठी बजेट नाही असे अधिकारी सांगतात बजेट नव्हते तर टेंडर कॉल का केले.

उपअभियंता(स्लम ) :टेंडर झाल्याप्रमाणे सदरचे काम होईल. उर्वरीत राहिलेले काम संबंधीत गुत्तेदार यांना मार्क आउट देणार त्यानंतर सुरू होईल.

मा.महापौर :वार्डात स्पील ओव्हरची सर्व कामे सुरू झाली पाहिजे मागील वेळेस प्रशासनाला तसे आदेशीत केले होते.

श्री.सय्यद खुसरो :१० लक्षच्या वर कामे होणार नाही असे अधिकारी सांगतात. काम सुरू केल्यानंतर मार्कआऊट करून देणे हे नियमाने बरोबर आहे का? वर्क ऑर्डर केव्हाची आहे काम केव्हा होत आहे.

मा.महापौर :संबंधीत अधिकारी यांनी ताबडतोब मार्कआऊट देवून त्वरीत त्या कामास सुरूवात करावी.

श्री.सय्यद खुसरो :सदरचे काम १० लक्षच्या कामात होते की त्या व्यतिरिक्त होत आहे.

श्री.सलीम खान :स्पील ओव्हरची कामे वेगळी असून,१० लक्ष मधून होणारी कामे ही वेगळी आहे.

श्रीमती मेहरून्नीसा खान:मा.आयुक्तांनी पत्र दिले. स्पील ओव्हरची कामाचा यात समावेश करून १० लक्षच्या वरती कामे होत नाही अधिकारी दिशाभूल करीत आहे.

श्री.प्रशांत देसरडा :टेंडर झालेली कामे तसेच जे काम चालू होते तेही बंद करण्यात आले मा.आयुक्तांनी एक परीपत्रक काढले १० लक्षच्या आत कामे दयावी या मागे प्रशासनाचा हेतू काय सदस्यांना समजला नाही, किती चालू कामे बंद केली किती कामाचे टेंडर,वर्क ऑर्डर झालेल्या तसेच ज्यांनी २ टक्के रक्कम भरणा केलेली आहे त्यांचेही वर्क ऑर्डर थांबविली. ही सर्व कामे का थांबविली याचा पुढील बैठकीत वार्ड निहाय माहिती सादर करण्यात यावी. पत्र देवून काम होणार नाही प्रशासनाने सभागृहात येवून मत मांडावे वार्डात नागरीकांना ज्या अडचणी येतात त्याची दखल घेतली जात नाही. मा.आयुक्तांनी एक तास महापालिकेत येवून नागरीक नगरसेवक तक्रारींचे निवारण करावे अनेक अधिकारी कर्मचारी यांचे बदल्या प्रशासनाने केल्या उपअभियंता यांचेच बदल्या न करता सर्वच कार्यकारी अभियंता यांचेही बदल्या कराव्या येत्या सर्वसाधारण सभेत खुलासा करावा.

श्री.महेश माळवतकर :सिडकाचे हस्तांतरण होवून अडीच वर्ष झाली. सिडको,हडको भागात कोणतीही विकास कामे होत नाही अनेक रस्त्याचे चालू असलेल्या कामापैकी सिडकोत टी.व्ही.सेंन्टर ते एमजीएम हॉस्पीटल पर्यंत एकाच बाजुने रस्त्याचे काम चालू असून आठ महिण्यापासून रस्ता एका बाजूने खोदून ठेवला बाजूचा एक साईडचा रस्ता अरूंद असून सिंगल वाहतूक सुध्दा होत नाही रस्त्याच्या बाजूला एमएसईबीचे स्ट्रीट लाईट आहे वाहतूकीस अडथळा येतो अनेक अपघात या रस्त्यावर होतात एन-६ ते आझाद चौक ते सावरकर चौक व पुढे टी.व्ही सेन्टर असे तीन टप्प्यात काम असतांना किर्ती मंगल कार्यालय ते टी.व्ही सेन्टरचा अतिशय महत्वाचा रहदारीचा रस्ता गेल्या ७-८ महिण्यापासून खोदून ठेवला यामूळे नागरीकांना मोठा त्रास होत आहे याकडे प्रशासन लक्ष का देत नाही? हस्तांतरण झाले तेव्हा शासनाने व सिडकोने सिडकोच्या विकासासाठी निधी दिला परंतू या भागात विकासाकडे दुर्लक्ष होते दोन रस्ते तर परस्पर वगळून टाकले. रस्त्याचे काम थांबवून ठेवले असा दुजाभाव ठेवणे बरोबर नाही. या रस्त्यावर मोठा अपघात झाल्यास प्रशासन यास जबाबदार राहील सुज्ञ नागरीक तो रस्ता बंद म्हणून दुसऱ्या

रस्त्याने निघून जातात डिफर पेमेंन्टवर हे रस्ते होत असेल व त्यासाठी तरतूद येत असेल तर शेवटी सिडको हडकोतील रस्ते सगळयाच्या शेवटून का होतात याकडे लक्ष देण्याची गरज आहे. सिडको हडको भागात वसुली चांगली असतांना विकास कामाकडे दुर्लक्ष होत असेल तर प्रशासनाला आम्ही सहकार्य करणार नाही. स्पील ओव्हरची कामे सुरू केली त्या ठेकेदारांना पुढील पेमेन्ट मिळत नाही म्हणून काम बंद केले. ज्या सोसायटीस टॅक्स पाणीपट्टी भरणा करतात अशा ठिकाणी रस्ते व इतर विकास कामे करण्याची गरज आहे जकातीतून उत्पन्न येते वसुली करण्याची जबाबदारी ही प्रशासनाची असते शहर अभियंता यांनी पत्र देवून वार्ड अभियंता यांना कळविले की टेंडर झालेली नाही. पुन्हा निविदा काढाव्यात ड्रेनेजचे लहान काम असेल तर त्यास दोन महिणे लागत आहे हे बरोबर नाही. यास प्रशासन जबाबदार असून नुसते आश्वासन देण्याचे काम प्रशासनाने करू नये प्रत्यक्ष कामास सुरूवात करावी.

श्री.सय्यद खुसरो :स्पील ओव्हरचे कामाचे टेंडर होवून वर्क ऑर्डर दिली ते काम का बंद करण्यात आले. कोणते मार्कआउट देणार आहे. अंदाजपत्रक केले तेव्हा नकाशा केलेला नव्हता का सविस्तर खुलासा घ्यावा.

मा.महापौर :स.सदस्य श्री.खुसरो यांचे वार्डातील सदरचे काम पुर्ण करण्यात यावे. याच प्रमाणे स.सदस्य श्री.माळवतकर व इतर सदस्यांनी विकास कामाच्या संदर्भात भावना व्यक्त केल्या अशी सर्व स्पील ओव्हरची टेंडर झालेली व टेंडर प्रोसेसमध्ये असलेली सर्व कामे शहर अभियंता यांनी तातडीने सुरू करावी. या पूढे स.सदस्यांच्या अशा तक्रारी येणार नाही यांची दखल घेण्यात यावी. पुढील बैठकीत कोणकोणती कामे केली कोणती अर्धवट सोडली व कोणती केली नाही याची यादी पूढील बैठकीत सादर करावी. जे अधिकारी विकास कामाच्या बाबतीत कुचराई करतील त्यांचेवर कार्यवाही होईल.

श्री.सय्यद खुसरो :काम का बंद केले. दुर्लक्ष केलेले आहे त्यांची माफी मागवावी.

श्री.भगवान घडमोडे :सदर ठिकाणी पाहणी करण्यात यावी.

श्री.सय्यद खुसरो :अति.शहर अभियंता यांनी यासाठी निधी नाही १० लक्षच्या वर काम करू नये असे म्हटलेले आहे. मार्क आऊट आता करीत आहे अंदाजपत्रक कशाच्या आधारे तयार केले.

मा.महापौर :जे अधिकारी दिरंगाई करतील त्यांचेवर कार्यवाही होईल. शहर अभियंता यांनी उद्या स्वतंत्र रित्या सदर ठिकाणी जावून पाहणी करून पुढील कार्यवाही सुरू करावी.

अति.शहर अभियंता :दुरध्वनी वरून माझेशी संपर्क स.सदस्य यांनी संपर्क साधला असता आवश्यक असलेली १० लक्षपर्यंतची कामे या वर्षासाठी आपण सुचवावी ती कामे करण्यात येईल असे म्हटले होते.

श्री.सय्यद खुसरो :जलतरण तलाव किंवा उद्यान काम नाही रस्त्याचे महत्वाचे काम होते प्रशासन टाळाटाळ करीत आहे हे योग्य नाही.

श्री.सलीम खान :स्पील ओव्हरची तसेच १० लक्ष पर्यतची करावयाची कामे सुध्दा आज होत नाही यावरून केलेले बजेट बुक बोगस आहे सिध्द होते. १० लक्षची कामे सुचवली प्रत्येक वार्डात किती रक्कमेची कामे झाली तसेच जकातीच्या माध्यमातून ८ महिन्याचे ८० कोटी प्राप्त झाले ते कुठे खर्च केले खुलासा घेण्यात यावा.

मा.महापौर :महापालिकेच्या तिजोरीत कशा प्रकारे उत्पन्न येते व त्यांचा विनियोग कसा केला जातो याची संपूर्ण लेखी माहिती मुख्यलेखा परीक्षक यांनी स.सदस्य श्री.सलीम खान यांना द्यावी.

श्री.सलीम खान :१० लक्षचे काम का होत नाही.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर :सिडको,हडकोतही कोणतेही विकास कामे होत नाही. जोपर्यंत काम चालू होत नाही नागरीकांचा दबाव येतो निगेटिव्ह वातावरण निर्माण होत आहे.क्रांतीचौक येथील ९ एकर महापालिकेच्या जागेच्या संदर्भात आयबीएन चॅनलवर दाखवले ती जागा कुठे आहे हे महापालिकेने शोधावे व ती महापालिकेची मालमत्ता म्हणून हस्तगत करावी.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:महापौर दालनात अधिकाऱ्यांची बैठक घेवून प्रशासनाच्या अडचणी समजून घेवून उर्वरित तीन महिण्यात सर्व विकास कामे करण्याचे सुचना देण्यात याव्यात. १० लक्षमधील कोणत्या वार्डात किती कामे झाली कोणकोणत्या वार्डात किती कामे चालू आहे याची त्या त्या वार्डाच्या स.सदस्यांना माहिती द्यावी. मार्च अखेर पर्यंत किती होणार. ५० लाखापर्यंत किती कामे झाले. मा.आयुक्तांनी भू घोटाळा काढले. पैठण गेट होत नव्हते कोर्टाकडून जिंकले, अभिनंदन करावे. अधिकाऱ्यांची बैठक लावा काय काम राहिले प्रशासनाची बाजु मांडावी. १० लाखांची कामे कोणते रूलींग द्यावी.

श्रीमती मेहरून्नीसा खान:१० लक्ष रक्कमेपर्यंतच्या कामाचे अंदाजपत्रक तयार करून तात्काळ सुरू करण्याचे आदेशीत करावे आचारसंहिता लागण्याची शक्यता आहे. कटकटगेट रस्त्यावर काम चालू असतांना सहा वर्षाच्या मुलांचे अंगावर टॅक्टर मधील मटेरियल पडल्यामूळे त्याचा हात फॅक्चर झाला त्यास आर्थिक मदत देण्यात यावी कमी रेट मध्ये ठेकेदार काम करण्यास तयार नाही त्यांचेशी चर्चा करून दर वाढवून कामास सुरूवात करावी नेहरूनगर रस्त्याचे टेंडर झाले ३० टक्के काम झाले मटेरियल येवून पडले काम थांबलेले आहे ते ही तात्काळ करण्याचे आदेशीत करावे.

श्री.नासेर नाहदी : बीबीचा मकबरा मागे लिगल ८ सोसायटीज असून तेथील नागरीकांसाठी रस्ता नाही पाण्याची सुविधा नाही टँकरद्वारे पाणी दिले जात होते रस्ता नसल्यामूळे ते ही बंद झाले. निधी उपलब्ध करून त्वरीत या रस्त्याचे काम करावे.

श्री.दिलीप गायकवाड :महापालिकेच्या गेट समोर आरोग्य विभागातील कर्मचारी उपोषणास बसले आहे त्यांची आपण भेट घ्यावी. २० वर्षापासून ते काम करतात.

श्री अ.रशिद खान :गेल्या १० महिण्यात डिसेंबर पर्यत कोणत्या वार्डात किती रक्कमेची कामे झालेली आहे. यांची माहिती घ्यावी १० लक्षची कामे करण्याचे टारगेट दिले. अंदाजपत्रक,टेंडर झाले नाही जे केले तेही कामे बंद आहे. २ महिण्यात कामे होण्यासाठी काय धोरण ठरविणार आहे. मागिल वर्षातील स्पील ओव्हरच्या कामाचे टेंडर झाले ठेकेदार करण्यात तयार नाही. कटकट गेट कामाचे टेंडर झाले काम का थांबविण्यात आले सदर गेट पडण्याच्या स्थितीत आलेला आहे केंव्हा पडेल सांगता येत नाही. १० महिण्यात एकही काम झाले नाही २ महिण्यात होतील का नुसती चर्चा होवून निर्णय होणार असेल कामे होणार नसेल तर योग्य नाही.

मा.महापौर :आताच अनेक संदस्यांनी वार्डात विकास कामे बंद असल्याची भावना व्यक्त केली त्यानुसार स.सदस्य श्री.सय्यद खुसरो यांचे वार्डातील पेव्हर ब्लॉकचे अर्धवट राहिलेले कामाची संबधीत अधिकारी यांनी पाहणी करून ते काम

पूर्ण करावे तसेच टी.व्ही सेन्टर ते एमजीएम हॉस्पीटल रस्ता नेहरूनगरचा रस्ता,बीबीचा मकबरा मागे ८ लिगल सोंसायटीजसाठी असलेल्या रस्त्याचे पॅचवर्क असेल,कटकटगेटची दुरूस्तीचे काम असेल व शहरातील इतर विविध आवश्यक असलेल्या रस्त्याचे काम सुरू करावे तसेच सर्वच वार्डात विविध विकास कामे सध्या बंद आहे ती विकास कामे व स्पील ओव्हरमधील टेंडर, वर्कऑर्डर झालेली व आवश्यक सर्व कामे त्वरीत प्रशासनाने सुरू करावी. व किती कामे सुरू केली किती पुर्ण झाली व किती राहिलेली आहे ती केंव्हा पुर्ण होतील याची सविस्तर माहिती पुढील बैठकीत प्रशासनाने ठेवावी असे आदेशीत करण्यात येते.

श्री.अ.रशिद खान :विकास कामे केव्हा पूर्ण होतील खुलासा घेण्यात यावा.

मा.महापौर :शहर अभियंता यांनी खुलासा करावा.

शहर अभियंता :विकास कामा विषयी ज्या भावना स.सदस्यांनी व्यक्त केल्या त्यास मी सहमत आहे सर्वच वार्डात विकास कामे व्हावी असा प्रशासनाचा दृष्टीकोन आहे. स्पील ओव्हरची कामे अगोदर करण्याची गरज आहे. कामे सुरू करावी ठेकेदारांना संबंधीत सर्व अधिकारी व कर्मचारी यांना विकास कामे सुरू करण्याच्या सुचना दिल्या ठेकेदाराची बिले देणे असल्यामूळे काम सुरू करीत नाही. कोणत्या वार्डात किती रक्कमेची कामे झाली कोणती राहिलेली आहे याची माहिती सध्या माझेकडे नाही. परंतु सर्वच वार्डात विकास कामे करण्याचा प्रयत्न होईल. एक महिण्याच्या आत विकास कामे सुरू होतील.

श्री.संजय जगताप : वार्ड अभियंता अ यांना वारंवार तक्रार देवूनही विकास कामाकडे दुर्लक्ष करतात. वार्ड अभियंता एकच असतात परंतू वॉर्ड अ मध्ये कनिष्ठ अभियंता किती आहे, याची माहिती वार्ड अभियंता यांनी द्यावी. सर्व शिक्षा अभियान अंतर्गत करण्यांत आलेल्या विविध साहित्याची खरेदी खर्चाबाबत विषयाकिंत प्रकरणांत आपणांस कळविण्यांत येते की, सर्व शिक्षा अभियानासाठी शासनाकडून निधी प्राप्त असतो. निधीचा विनियोग योग्यप्रकारे होतो किंवा नाही तसेच करण्यात येत असलेल्या खर्चाची खरेदी निविदा काढून नियमावली केली नाही यावर नियंत्रण ठेवणे आपले कर्तव्य आहे,परंतू सर्व शिक्षा अभियान अंतर्गत झालेला खर्च हा नियमबाह्य केलेला असून गेल्या तीन वर्षाच्या साहीत्य खरेदीची चौकशी केल्यास आपल्या निदर्शनास ही बाब स्पष्ट होईल. तरी आपणांस विनंती की, शासनाने दिलेल्या निधीचा सर्व शिक्षा अभियानावर खर्च झालेल्या संचिकेची तपासणी करावी. दोषी अधिकाऱ्यावर कार्यवाही करावी. १९९२ च्या जीआर विरूध्द लाखो/करोडो रूपयाची साहित्य खरेदी झालेली आहे, यावर एक चौकशी समिती नेमावी अशी मा.महापौरांना विनंती आहे. डायरेक्ट खरेदी करोडोची झालेली आहे. यात खूप मोठा अधिकाऱ्यांनी भ्रष्टाचार केलेला आहे. म्हणून एक समिती नेमावी अशी महापौरांना विनंती आहे.

श्री.कैलास गायकवाड :हा विषय सर्व सदस्यांना समजणे आवश्यक आहे.या बाबतीत सर्व माहिती पुढील सभेत मागवावी त्यावर चर्चा होवून योग्य तो निर्णय घ्यावा.

मा.महापौर :सर्व शिक्षा अभियान अंतर्गत विविध साहित्य खरेदी व अनेक प्रोजेक्ट राबवित असतो. आताच स.सदस्य यांनी म्हटल्या प्रमाणे यावर झालेला खर्च हा व्यवस्थीत झालेला नाही याची संबधीत अधिकारी यांनी संपूर्ण माहिती तसेच सर्वशिक्षा अभियान अंतर्गत कोणकोणते उपक्रम राबवितो याचीही

माहिती सादर करावी एक सदस्यीय समिती स्थापन करण्यात येते मा.आयुक्तांनी या विषयाची माहिती घ्यावी, आणि ती सभागृहात ठेवावी.

श्री.संजय जगताप : या समितीत ज्येष्ठ सदस्य म्हणून स.श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय किंवा स.श्री.अ.रशिद खान मामु यांचा समावेश करावा.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : हे अधिकाऱ्यांच्या संबंधीत आहे,प्रशासनाच्या संबंधीत आहे, प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करावी.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉयः चौकशी अधिकाऱ्यांनी करायला पाहीजे. त्याचा अहवाल सभागृहाला द्यायला पाहीजे. किंवा मा.महापौर मा.सभापती स्थायी समिती यांना द्यायला पाहीजे. लेखाधिकारी यांची डायरेक्ट वार्ड अधिकारी म्हणून बदली केली. लेखाधिकारी हे लेखा विभागात असणे आवश्यक आहे त्यांचे बाबतीत चौकशी करावी भ्रष्टाचार झाल्याचे निष्पन्न झाल्यास निलंबीत करावे दुमत नाही. हा प्रशासनाचा भाग आहे परंतू कोणते अधिकारी कुठे नियुक्त करावे याची नियमावली असते. कुणावर अन्याय होणार नाही याची दखल घेण्यात यावी.

श्री.हिम्मतराव दाभाडे :एसएससी बोर्ड ते एकनाथनगर,पीरबाजार ते दर्गा पर्यंतचा रस्त्याचे काम कोणत्या विभागाकडून होणार व केव्हा होणार आहे.

मा.महापौर :सर्वच वार्डातील विकास कामाबद्दल प्रशासनाला आदेशीत केलेले आहे. जे काम राहिले असेल त्या बाबतीत संबंधीत आधिकारी यांचे निदर्शनास आणून द्यावे.

श्री.हिम्मतराव दाभाडे :हा सार्वजनिक रस्ता आहे वार्डातील हे काम येत नाही सन २००७ मधील पेव्हर ब्लॉकचे ११.८५ लक्षचे टेंडर निघाले २ टक्के रक्कम भरल्याचे पत्र संबंधीत अभियंता यांनी न दिल्यामूळे ते काम लॅप्स झाले. तुलशी अपार्टमेंन्ट मध्ये ३ वर्षापासून पिण्याच्या पाण्याची टंचाई असल्याने १० लक्षच्या कामात त्या ठिकाणी पाईपलाईन टाकावी पत्र दिले. अदयाप पुढील कार्यवाही नाही.

मा.महापौर :पिण्याच्या पाण्याचा प्रश्न महत्वाचे काम आहे संबंधीत अधिकारी यांनी लक्ष घालावे.

श्री.मिलींद दाभाडे :महिला सफाई कर्मचारी यांचेसाठी साडया खरेदी केल्या त्यात मोठा भ्रष्टाचार झालेला आहे. त्याची चौकशी व्हावी.

मा.महापौर :मा.आयुक्त यांनी चौकशी करून अहवाल सादर करावा.

श्री.जेम्स बी अंबीलढगे सांजवार्ता वृत्तपत्रात इमारत निरीक्षक यांनी ५३ हजार बोगस अनधिकृत बांधकामाबाबत पावत्या दिल्या असे आले हे सत्य असेल तर यात मोठा भ्रष्टाचार झालेला असावा ती बातमी खरी आहे का यासाठी एक चौकशी समिती नेमावयास पाहिजे. भ्रष्टाचारा विषयी बातम्या येतात त्यांची दखल घेतली जात नाही. वर्षभरात ज्या ज्या बातम्या महापालिकेविषयी आलेल्या आहे त्याची यादी तयार करून आतापर्यंत काय निर्णय घेतलेले आहे. बातमी येते ती खरीच असते ते का लपविले जाते. चौकशी का होत नाही हे सभागृहासमोर यावे. यात महापालिकेची बदनामी होते. त्यासाठी चौकशी समिती नेमून कार्यवाही होणे आवश्यक आहे.

मा.महापौर :अनेक बातम्या महापालिकेच्या संदर्भात येत असतात. त्यात काय तथ्य आहे हे प्रशासनाने शोधले पाहिजे आताच म्हटल्याप्रमाणे ५३ हजार पावत्या ज्या अनधिकृत दिल्या गेल्या त्यात काय तथ्य आहे हे प्रशासनाने शोधावे व दोषी असणाऱ्यावर कार्यवाही होणे गरजेचे आहे.

श्री.अशोक विरकर :एन-५ मधील सिध्दार्थ चौकातील स्ट्रीटलाईन अनेक दिवसापासून बंद आहे त्याच चौकात शिवाजी महाराज यांचा पुतळा असून वारंवार एजन्सीकडे

तसेच संबंधीत अधिकारी यांचेकडे लाईट लावण्यासाठी तक्रार केली, परंतु दिवे चालू झाले नाही. सिडको म्हाडा कॉलनीतील सर्व नागरीक त्या चौकातून जा-ये करतात. तसेच या भागात सुलभ शौचालय करण्यात यावे. माझ्या वार्डात पेव्हरब्लॉक व रस्त्याची कोणतीच कामे झालेली नाही ती करण्यात यावी त्यासाठी विशेष बाब म्हणून कार्यवाही करावी.

मा.महापौर :कार्य.अभियंता (विद्यु.)यांनी या चौकात स्ट्रीट लाईट लावण्याची व्यवस्था करावी.

**विषय क्र. ३६६ :**

दिनांक १८.११.२००८ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:इतिवृत्तातील पान क्र.७ व १० वर मी बोललो सहकार एजन्सीला ठेका देण्यास आमचा विरोध होता तो यात नोंदविला नाही. मंजूर करतांना अटी शर्ती काय आहे ते दाखवून द्यावे. नाशिक महापालिकेची वसूली २०० कोटीच्या वर गेली. १११ कोटीवरून १२३ कोटीपर्यंत १२ कोटी एकदम वाढविले होते. एक वर्ष निघून गेले १२३ कोटीच वसुलीचे टारगेट आहे. १२३ कोटी पेक्षा जास्त वसूली होईल एजन्सीकडून वसूल होत नसेल तर महापालिकेने वसूली करावी १५० कोटीपर्यंत वसूली होईल असे माझे ठाम मत आहे.

मा.महापौर :एजन्सीला वसुलीचा ठेका देण्यास काही सदस्यांचा विरोध होता त्यांचा विरोध नोंदवण्याच्या दुरूस्तीसह इतिवृत्त कायम करण्यास मंजूरी देण्यात येते

**ठराव :**

दिनांक १८.११.२००८ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणेस मान्यता देण्यांत आली.

**विषय क्र. ३६७ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, यांचे आदेश क्र.एसएटी-३३०६/(३०७/०६)/प्रशा-२. दि.३१ जुलै २००६ नुसार श्रीमती एल.जी.धेनक, गटशिक्षणाधिकारी,पं.स.जालना यांची शिक्षणाधिकारी, महानगरपालिका औरंगाबाद या पदावर प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार प्रथमतः दोन वर्षाच्या कालावधीसाठी प्रतिनियुक्तीने नेमणूक करण्यात आली आहे.

त्याप्रमाणे श्रीमती एल.जी.धेनक, यांना शिक्षणाधिकारी या पदावर दि.७/९/२००६ रोजी मध्यान्हापूर्व रूजू करून घेण्यात आले. दि.२५/९/२००६ रोजी (दि.२०/९/२००६ ची तहकुब) संपन्न झालेल्या मा.सर्वसाधारण सभेने विषय क्र.४३३ नुसार दि.७/९/२००६ पासून प्रथमतः दोन वर्षाच्या कालवधीसाठी प्रतिनियुक्तीने नेमणूक करण्याबाबत ठराव मंजुर केलेला आहे. सदर नियुक्तीचा कालावधी दि.६/९/२००८ रोजी संपत असल्यामुळे व महापालिकेला त्यांच्या सेवेची आवश्यकता असल्याने त्यांचा नियुक्तीचा कालावधी दि.७/९/२००८ पासून पुढील एक वर्षाकरीता प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीच्या अधिन राहून मुदतवाढ देण्याबाबत प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री.भगवान घडमोडे :शिक्षणाशिवाय कोणत्याही क्षेत्राचा विकास होवू शकत नाही मुदतवाढ देण्यास हरकत नाही परंतू त्या-त्या विभागातील अधिकारी यांनी तो विभाग सक्षम होण्यासाठी काय काम केले जसे ऑडीट होते तसा लेखाजोखा या सभागृहासमोर यायला पाहिजे. प्राथमिक शिक्षणावर पुढे त्या विद्यार्थ्यांची प्रगती होते. महापालिका शाळेत सर्वसामान्य व गरीब लोकांची मुले शिक्षण घेतात शिक्षणाकडे लक्ष देण्याची गरज आणखी ज्या काही सवलती देता येत

असेल त्या द्याव्यात. शैक्षणिक प्रगती झाल्यास तो व्यक्ती आरोग्य चांगले ठेवू शकतो देशासाठी हातभार लावू शकतो. शिक्षणात प्रगती झाली नाही तर देशाच्या संरक्षणाला सुध्दा धोका निर्माण मुंबई महापालिकेच्या शाळेत ॲडमिशन मिळावे म्हणून स.सदस्यांचे शिफारस पत्र सोबत दिले जाते. येथे शाळेतून नाव काढण्यासाठी दिले जाते. ही परीस्थिती सुधारली पाहिजे लेखाजोखा घ्यावा त्यानंतर मान्यता द्यावी.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर अनेक खाजगी विना अनुदानित शाळा शहरात असून मोठया प्रमाणात शाळा फिस घेतात त्यामूळे पालक व विद्यार्थ्यांची कुचंबणा होते त्यासाठी महापालिकेने ठराविक ४-५ झोन मध्ये जेथे महापालिकेची जागा असेल मोठया इमारती असेल तेथे मॉडेल शाळा ओपन कराव्यात तेथे चांगले शिक्षण द्यावे एकाच वेळी १००० ते ५००० विदयार्थी शिक्षण घेतील अशी व्यवस्था करावी.

श्री.भगवान घडमोडे :चांगली सुचना केलेली आहे चिकलठाणामध्ये महापालिकेची शाळा असून मोठी इमारत आहे मोठे मैदान आहे विदयार्थ्यांना गणवेश बुट सॉक्स पुस्तके दिली जातात सर्व सुविधा असतांना तेथे शिक्षकांचा अभाव असल्याने शाळेत प्रवेश घेत नाही. बाजूलाच एक खाजगी शाळा असून तेथे मैदान नाही बसण्यासाठी चांगली व्यवस्था नाही मोफत पुस्तके गणवेश नाही परंतू तेथे ॲडमीशनसाठी रांगा लागतात. याचा विचार होणे गरजेचे आहे.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:संबंधीत अधिकारी यांनी दोन वर्षात शाळेच्या बाबतीत काय सुधारणा केली किती विद्यार्थी संख्या वाढलेली आहे. याचा अहवाल घ्यावा. हा विषय मंजूर करावा.

श्री.हिम्मतराव दाभाडे : सर्व सुविधा दिल्या जात असतांना संख्या न वाढण्याचे कारण शिक्षक मुलांना शिकवीत नाही वार्ड ९० मध्ये महापालिकेच्या शाळेत ३ शिपाई असतांना विद्यार्थ्यांना साफसफाई करावी लागते त्या शाळेचे शिक्षक व शिपाई काय काम करतात शिक्षणाधिकारी यांनी तेथे पाहणी करावी.

श्री.नासेर नाहदी शिक्षण ही मुलभूत गरज आहे. सर्व शिक्षा अभियान अंतर्गत शासनाकडून कोटयावधीचे फंड व खर्च होतो. मी शिक्षण समितीचा सदस्य आहे. शिक्षणाधिकारी यांनी शाळेच्या प्रगतीसाठी काय काम केले, शिक्षणावर किती कसा व खरोखरच तेवढा खर्च होतो का? विदयार्थ्यांना शिक्षण दिले जाते का यावर हे शिक्षण अधिकारी आल्यावर विद्यार्थ्यांच्या संख्येत २ वर्षात किती वाढ किंवा घट झाली चर्चा व ठोस निर्णय घेण्यासाठी शिक्षण विभागावर एक विशेष बैठक आयोजित करावी म्हणून मागणी केली होती. परंतु लावली नाही. सर्व शिक्षा अभियान अंतर्गत होणाऱ्या कामाकडे या विभागाचे दुर्लक्ष झाले वारंवार निदर्शनास आणून दिले. शासनाकडून ५० टक्के अनुदान मिळते ते दोन वर्षापासून मिळाले नव्हते. आम्ही पाठपुरावा करून तीन कोटीचे अनुदान मिळविले ते मिळण्यासाठी शिक्षणाधिकारी यांनी पाठपुरावा करणे गरजेचे असते. शाळेला व्हिजीट देणे इमारतीची देखभाल दुरूस्ती करून घेणे विद्यार्थ्यांना बसण्यासाठी पट्टी,तसेच शिक्षक वर्ग मुलांना शिकवितात की नाही याकडे लक्ष देण्याची गरज होती या संदर्भात वारंवार शिक्षण समितीच्या बैठकीत मुद्दे मांडले परंतू त्याकडे दुर्लक्ष केले जाते. संबंधीत अधिकारी यांनी दोन वर्षात सर्व शिक्षा अभियांन असलेल्या कार्यालयात जास्त वेळ घालविला त्यामूळे शिक्षण विभागाकडे दुर्लक्ष केले. शिक्षक सेवक भरती संदर्भात मोठा भ्रष्टाचार झाल्याची तक्रार काही

उमेदवारानी उपसंचालक मुंबई कार्यालयाकडे केली त्या कार्यालयाचे १३ मार्च व १७ एप्रिल २००८ मध्ये या बाबत सखोल चौकशी करून अहवाल सादर करावा म्हणून महापालिकेला पत्र आले परंतु अद्याप काहीही कार्यवाही झाली नाही. आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी पात्र शिक्षक निवडण्यासाठी कमेटीची निवड केली नाही मा.आयुक्तांनी मान्यता नाही. ज्यांनी मागणी केली त्यांची व इतर शिक्षणाधिकारी यांनी मनमानी करून जी नावे टाकून ठराविक शिक्षकांना पुरस्कार दिले जे पात्र होते त्यांचेवर अन्याय झालेला आहे श्रीमती बुलबुले जामवाडी येथे जि.प.शाळेमध्ये शिक्षक होत्या. शासनाचे पती-पत्नी एकत्रीकरण या जीआर नुसार त्यांचे पती स्थानिक ठिकाणी सेवेत आहे असे दाखवून दिशाभूल करून त्यांना महापालिकेच्या सेवेत समावून घेण्यात आले घेण्यात आले परंतू आजही त्यांचे पती हिंगोली येथे एसआरपी विभागात कार्यरत आहे. यात संबंधीत अधिकारी यांनी प्रशासनाची दिशाभूल केली आहे. नवीन शिक्षक सेवक भरतीत खुल्या संवर्ग व महिला आरक्षणातील जागेचा विचार न करता इतर संवर्गातील उमेदवारांना मिळालेल्या गुणाची टक्केवारी न बघता मोठा भ्रष्टाचार करून सेवेत घेतलेले आहे आताच जे मुद्दे मी मांडले त्याची संपूर्ण चौकशी करावी त्यानंतर शिक्षणाधिकारी यांना मुदतवाढ देण्याचा या सभागृहाने निर्णय घ्यावा.

श्री.महेश माळवतकर : प्रतिनियुक्ती दिली पाहिजे शासनाकडून आलेल्या अधिकाऱ्यांनी शिक्षणांकडे जवाबदारीने पाहिले पाहिजे. फक्त सर्वशिक्षण अभियानाकडेच लक्ष देतात. शिक्षणासाठी सर्वशिक्षा अभियांन अंतर्गत केंद्रशासनाकडून कोटयावधी निधी येतो. शाळेची खोली,शौचालय किंवा इतर कामासाठी निधी येत असेल तर ते काम चांगले व तातडीने कसे होईल याकडे लक्ष देण्याची गरज आहे २० हजार मुले ही या शहरातील सर्वसामान्य आपल्याच समाजातील गरीब लोकांची शिक्षण घेतात.महापालिकेतील कुणाचीही मुले महानगरपालिकेच्या शाळेत नाही त्यांना चांगले शिक्षण देण्याची जबाबदारी महापालिकेची आहे काही शिक्षक शिक्षणाधिकारी यांना खुष ठेवण्यास किंवा पुढील पद मिळविण्याच्या दृष्टीकोन समोर ठेवून शिकवितात. अनेक शिक्षक शाळेच्या वेळात मुख्य कार्यालयात असतांत दोन वर्षात शिक्षकांची वागणूक शिक्षणाधिकारी यांना समजली असेल एखादे विकासाचे काम झाले नाही तर चालेल परंतू विदयार्थ्यांचा चांगले शिक्षण देण्याकडे लक्ष द्यावे शिक्षकावर वचक असावा. शाळा सुटल्यानंतर संरक्षित भिंतीचे गेट खिडक्याचे गज काही लोक काढून घेवून जातात वॉचमन नसेल तर ते नियुक्त करावे. ही जनतेची संपत्ती आहे वाऱ्यावर सोडू नये दोन वर्ष यांनी चांगले काम केले परंतु यापूढेही महापालिकेच्या शाळेचा दर्जा आणखी चांगला कसा होईल यासाठी जे करता येईल ते प्रयत्न करावे व संबंधीत अधिकारी यांना प्रतिनियुक्ती देण्यात यावी.

श्री.मिलींद दाभाडे शिक्षण विभागाकडून दलित बहुजन समाजाच्या विद्यार्थ्यांचे भविष्य उध्दस्त करण्याचे काम होत आहे. पदाधिकारी व वरीष्ठ अधिकारी यांनी या विभागाकडे लक्ष दिले पाहिजे. विदयार्थीना त्यांचे स्वतःचे नाव,राहण्याचे ठिकाण लिहिता येत नाही शिक्षकांची या विद्यार्थ्यांना शिकविण्याची मानसिकता नाही. शिक्षणाधिकारी सर्व शिक्षा अभियानाच्या कामात व्यस्त असतात शिक्षण विभागामध्ये मोठा भ्रष्टाचार होत असून सोयीच्या ठिकाणी घराजवळ शिक्षकाकडून मोठया रक्कमा घेवून बदल्या करून दिल्या जातात.

ज्या मुख्याध्यापकाचे शिक्षकावर लक्ष नाही संबंधीतावर कार्यवाही करावी मार्चमध्ये परीक्षा जाहीर होतात त्यावेळी विदयार्थ्यांना गणवेश दिले जातात अनेक दिवस शाळेत गणवेश पडून असतात याकडेही शिक्षणाधिकारी यांचे लक्ष नसून कर्मचाऱ्यांकडून पैसे घेवून त्यांचे बदल्या करण्याचे काम सध्या मोठया प्रमाणात होत आहे. विदयार्थ्यांवर अन्याय होत आहे तो थांबविला पाहिजे. सर्व शिक्षा अभियांनमध्ये लाखोचा भ्रष्टाचार झाला त्याची चौकशी व्हावी. शिक्षणाधिकारी महिण्यातून किती शाळेला भेटी देतात कोणत्या शाळेत किती शिक्षक असून कोणत्या वर्गासाठी आहेत संपूर्ण माहिती पुढील सभेत सादर करण्यात यावी.

श्रीमती मेहरून्नीसा खान :सर्व शिक्षा अभियान अंतर्गत लाखो रू.खर्च केले परंतू शाळेची परीस्थिती सुधारलेली नाही आजही अनेक शाळेत विदयार्थ्यांना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नाही. शाळेची वेळ ११ ते ५ वाजेपर्यत असतांना शिक्षक दु.२.०० वाजता शाळेत येतात याकडे शिक्षणाधिकारी यांचे लक्ष नाही. तसेच विदयार्थ्यांना देण्यात येणारे गणवेश बरोबर मापाचे येत नाही. एक दिवस विदयार्थी ते घालू शकत नाही या संदर्भात भ्रष्टाचाराचे आरोप केले जातात मनमानी होते परंतू चौकशी होत नाही.

श्री.दिलीप गायकवाड :नुसते शिक्षणाधिकारी यांना दोषी न ठरविता इतर विभागाचे अधिकारी सुध्दा लक्ष देत नाही. माझे वार्डात १९९६ पासून उर्दु माध्यमची शाळा असून दोन वर्षापासून विदयार्थ्यांना शिकविण्यासाठी संगणक दिले अनेक वेळा मागणी करून तेथे लाईटची संबंधीत अधिकारी यांनी व्यवस्था करून दिली नाही. संबंधीत विभागाने केली नाही. ज्या त्या विभागाचे जे काम असेल ते करण्याचे आदेशीत करावे.

मा.महापौर महापालिकेच्या शाळेत सर्वसामान्यांची मुले शिक्षण घेत असतात सर्व सुविधा दिल्या जात असतांना मुलांची संख्या कमी व शिक्षणाचा दर्जा आताच म्हटल्याप्रमाणे खालावलेला आहे. ज्या ज्या स.सदस्यांनी शाळेच्या विषयी तक्रारी केल्या त्या तक्रारीचे निराकरण करावे तसेच शाळेवर व्हिजीट देण्यात याव्यात झोनवाईज जेथे महापालिकेच्या मोठया इमारती किंवा ओपनस्पेस आहे अशा ठिकाणी मॉडल पध्दतीच्या शाळा सुरू कराव्यात जे अधिकारी प्रतिनियुक्तीवर येतात त्यांनी अगोदरच्या कार्यकाळ एक वर्षात कशा पध्दतीने काम केले त्यांचा लेखाजोखा या सभागृहासमोर सादर केला पाहिजे. अधिक चांगल्या पध्दतीने शिक्षण कसे देता येईल याची काळजी शिक्षणाधिकारी यांनी घ्यावी. शिक्षण समितीची बैठक आयोजित करावी त्या बैठकीत मी उपस्थित राहील ज्या सुधारणा करावयाच्या आहेत त्या केल्या जातील. या दुरूस्तीसह हा विषय मंजूर करण्यात येतो.

श्री.मिलींद दाभाडे :त्यांना परत पाठवावे मंजूरी देवू नये.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्रीमती एल.जी.धेनक,यांना शिक्षणाधिकारी, महानगरपालिका औरंगाबाद या पदावर दि.७/९/२००८ पासून पुढील एक वर्षाकरीता प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीच्या अधिन राहून मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३६८ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,वार्ड क्र.५७,मध्ये टप्पा क्र.-२ अंतर्गत भवानी नगर,दादा कॉलनी, तक्षशिलानगर,कैलाश नगर,स्मशान मारूती मंदिर पर्यंत वाहणाऱ्या नाल्यातील मुख्य सिव्हर लाईन बदलणे,पाईप लाईनसाठी कॉंक्रेट केसींग करणे, ज्या ठिकाणी संरक्षित भिंत नाही तेथे नाला

संरक्षित भिंत बांधणे व उपलब्ध केलेल्या तरतूदीच्या हद्दीपर्यंत शिल्लक निधी मधून काही भागाची नाला चॅनलिंग करणे, अशा कामाचे अंदाजपत्रक म.जी.प्रा/सा.बा. खाते दरसूची सन २००६-०७ नुसार तयार करण्यात आले आहे. उपलब्ध केलेल्या तरतुदीनुसार अ.प.रक्कम रू.४८.०० लक्षचे तयार करण्यात आले आहे.

मुळ संचीकेतील मु.ले.अ.यांचे टिप्पणीनुसार शासनाचे र.रू.१.७५ कोटी विशेष शासकीय अनुदान मंजूर केलेले असुन तेवढाच हिस्सा महानगरपालिकेने टाकवूण एकत्रित ३.५० कोटीच्या कामास शासनाने मान्यता प्रदान केली आहे. त्यापैकी हे एक काम आहे सदरील काम करणेसाठी ५०% मनपाचा निधी म्हणजेच र.रू.२४.०० लक्ष महानगरपालिकेस उपलब्ध करून द्यावी लागेल. तरी महानगरपालिकेच्या ५०% हिस्सा रक्कम रू.२४.०० लक्ष ची तरतुद उपलब्ध करणे आणि र.रू.४८.०० लक्षचे अंदाजपत्रकास मान्यता मिळणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

मा.महापौर : विषय मंजूर करण्यांत येतो.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.५७, मध्ये टप्पा क्र.-२ अंतर्गत भवानी नगर,दादा कॉलनी, तक्षशिलानगर,कैलाश नगर,स्मशान मारूती मंदिर पर्यंत वाहणाऱ्या नाल्यातील मुख्य सिव्हर लाईन बदलणे,पाईप लाईनसाठी कॉंक्रेट केसींग करणे, ज्या ठिकाणी संरक्षित भिंत नाही तेथे नाला संरक्षित भिंत बांधणे व उपलब्ध केलेल्या तरतूदीच्या हद्दीपर्यंत शिल्लक निधी मधून काही भागाची नाला चॅनलिंग करणे, अशा कामाचे रक्कम रू.४८.०० लक्षचे अंदाजपत्रकास मान्यता देण्यांत येते.

**<u>विषय क्र. ३६९ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरातुन वाहुण जाणारे प्रक्रिया रहीत सांडपाणी/मैलपाणी खामनदी व सुखना नदी मार्गे वाहते. परिणामी पाणी दुषीत होऊन परिसरातील पर्यावरणाचा समतोल राखणे शक्य होत नाही. हे वाहून जाणारे प्रक्रिया रहीत सांडपाणी/मैलापाणी वर प्रक्रिया करून नदी पात्रात न सोडणेसाठी प्रदुषण मंडळाच्या नोटीसेस प्राप्त होत आहेत.

पूर्वी नियोजीत केलेली वळदगाव पाटोदा शिवारातील सिवेज ट्रीटमेंट प्लॉटसाठी लागणारी जमीन अजूनही निधी अभावी मनपाच्या ताब्यात आलेली नाही.

पर्यावरणाचा समतोल राखणेसाठी उपलब्ध होणाऱ्या विविध ठिकाणी टप्पा टप्प्याने सिवेज ट्रीटमेंट प्लॉंट बांधण्याचे प्रस्तावीत आहे. मा.सर्वसाधारण सभा दिनांक २०/०९/२००८ विषय क्रमांक ३०१ अन्वये रक्कम रू.३०.०० कोटी निधीमधून DEWATS पध्दतीने सिवेज ट्रीटमेंट प्लॉंट उभारणेस मंजुरी दिलेली आहे. सदर रक्कम रू.३०.०० कोटी अनुदान प्राप्त झाले नंतर ठरावा नुसार कार्यवाही करणे शक्य होईल.

प्राप्त शासन निर्णय क्रमांक मविका/२००७/प्र.९९/का-१४५६/ मंत्रालय,मुंबई-३२, दिनांक २३ जानेवारी २००८ व शासन निर्णय क्रमांक संकीर्ण/२००८प्र. क्र.८६/नवि-१६/ मंत्रालय, मुंबई-३२, दिनांक २७ ऑगस्ट २००८नुसार प्रस्तावीत केलेल्या सिवेज ट्रीटमेंट प्लॉंटचा प्रकल्पाच्या २५% हिस्सा म्हणजेच रक्कम रू.६.२५ कोटी शासनाने मंजुर केले आहे. उर्वरीत रक्कम रू.१८.७५ कोटीचा भार/हिस्सा महानगरपालिकेने उचलणे शासनास अपेक्षीत आहे. परंतु महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती बिकट असल्याने रक्कम रू.१८.७५ कोटीचा हिस्सा घालून रक्कम रू.२५.०० कोटीचा प्रस्तावीत प्रकल्प हाती घेणे मनपास सध्या शक्य नाही.

मंजुर रक्कम रू.६.२५ कोटी पैकी, रक्कम रू.३.१३ कोटी महानगरपालिकेस प्राप्त झाले असून उर्वरीत रक्कम रू.३.१२ कोटी वर्ष २००९-२०१० वर्षात प्राप्त होणे अपेक्षीत आहे. या मंजुर रू.६.२५ कोटी शासकीय अनुदानातून डॉ.सलीम अली सरोवर परिसरात प्रथम टप्प्यात आधुनिक पध्दतीने जे सिवेज ट्रीटमेंट प्लॉंट उभारणेचे नियोजन आहे जेणेकरून प्रकल्प कमी जागेत उभारणे शक्य होईल.

मंजुर रक्कम रू.६.२५ कोटी अनूदान हे रू.२५.०० कोटीचा २५% हिस्सा गृहीत न धरता १००% शासकीय अनुदान असल्याचे गृहीत धरून सुधारीत अपेक्षीत मंजुरी मिळणेसाठी राज्य शासनास विनंती करण्यात येत आहे.

प्रस्तुत विनंती मान्य होईल या आधारे पुर्ण रक्कम रू.६.२५ कोटीचा सिवेज ट्रीटमेंट प्लॉट प्रकल्प Turn key Basis वर उभारणेसाठी पात्र एजन्सीकडून ऑफर मागविणेसाठी जाहीर सुचना प्रसिध्दीस देणे करीता मंजुरी व्हावी. तसेच मुंबई येथील कन्सल्टंट मे.फोट्रेस इन्फ्रास्टक्चर ॲडवायजरी सर्व्हीसेस यांना कांचनवाडी येथील प्रस्तावीत सिवेज ट्रीटमेंट प्लॉटचा कामासाठी प्रकल्प संकल्पनार्थी (PMC) म्हणून नेमणूक करणेस मा.स्थायी समितीने ठराव क्र.७०,दिनांक २४/०६/२००८ अन्वये प्रकल्प रक्कमेच्या ३% दराने मंजुरी दिली आहे. परंतु निधी अभावी कांचनवाडी येथील प्रस्तावीत सिवेज ट्रीटमेंट प्लॉट प्रकल्प प्रत्यक्षात सध्या हाती घेणे शक्य नसल्यामुळे डॉ.सलीम अली सरोवर परिसरातील जागेत उपरोक्त प्रस्तावीत सिवेज ट्रीटमेंट प्लॉट च्या कामासाठी PMC म्हणून मे.फोट्रेस इन्फ्रास्टक्चर ॲडवायझरी सर्व्हीसेस उक्त नमुद दरानेच यांची नियुक्ती करणेस देखील मंजुरी व्हावी.

तरी डॉ.सलीम अली सरोवरनजीक बांधण्यात यावयाच्या सिवेज ट्रीटमेंट प्लॉट च्या अंदाजे खर्च रू.६.२५ कोटीच्या अंदाजपत्रक व प्रकल्प संकल्पनार्थीसह प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**<u>संवाद :</u>**

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय: ३ टक्के दर कोठेही नाही. पीएमसीला प्रशासनाने वाटाघाटीसाठी बोलवून २ टक्के पर्यंत निश्चित करण्यास हरकत नाही ड्रेनेजचे काम आहे स्वच्छता असणे आवश्यक आहे.

मा.महापौर :आताच स.सदस्य श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय यांनी सुचना केल्याप्रमाणे सदर पीएमसीशी प्रशासनाने निगोशिएशन करावे २ टक्के प्रमाणे मंजूरी देण्यात येते. त्या पध्दतीने काम करावे हा विषय मंजूर करण्यात येतो.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार रू.६.२५ कोटीच्या शासकीय अनुदानातून डॉ.सलिम अली सरोवर परिसरात प्रथम टप्प्यात आधुनिक पध्दतीने सिवेज ट्रीटमेंट प्लॉट प्रकल्प Turn key Basis वर उभारणेसाठी पात्र एजन्सीजकडून ऑफर मागविणेसाठी जाहीर सूचना प्रसिध्द करणेस तसेच मुंबई येथील कन्सल्टंट मे.फोट्रेस इन्फ्रास्टक्चर ॲडवायजरी सर्व्हीसेस यांना प्रकल्प रकमेच्या २ % दराने PMC म्हणून नियूक्ती करणेस आणि सदर सिवेज ट्रिटमेंट प्लॉटच्या सुमारे रू.६.२५ कोटीच्या अंदाजपत्रकास व प्रकल्प संकल्पार्थी नेमण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. ३७० :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पातील पान क्रमांक डब्ल्यू-५६ वर खाली नमुद प्रमाणे तरतुद ठेवण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | पा.क्र. | कामाचे नांव | तरतुद (लाखात) |
|---|---|---|---|
| १० | W-५६ | सिव्हर रॉडींग व पॉवर बकेट यंत्राव्दारे वार्षीक पध्दतीने करावयाची देखभाल सहा वार्डासाठी प्रत्येकी र.रू.५.०० लक्ष व उर्वरीत या विभागासाठी. | ३३.०० |
| १५ | W-५६ | सिव्हर रॉडींग व पॉवर बकेट यंत्राव्दारे वार्षीक पध्दतीने करावयाची देखभाल दुरूस्ती. | ३३.०० |
| | | **एकुण रू.** | **६६.००** |

वेळोवेळी स.सदस्य,नागरीकांच्या जलनिःसारण वाहीन्या नादुरूस्त झाल्याच्या तक्रारी या कार्यालयास प्राप्त होतात, तथापी देखभाल दुरूस्ती व अति आवश्यक कामे करावयाची झाल्यास पुरेशी निधी अभावी कामे करणे शक्य होत नाही. त्यामुळे नागरीकांचा आरोग्याचा प्रश्न निर्माण होतो, अशा परिस्थितीत तातडीने कामे करणे, कामाचा प्राधान्य क्रम आवश्यकतेनुसार ठरविणे व त्यासाठी तत्काळ निधी उपलब्ध असणे आवश्यक ठरते.

अर्थसंकल्पातील उक्त नमूद उपलब्ध एकुण तरतुद र.रू.६६.०० लक्ष पैकी सिडको परिसरातील ड्रनेज (मलनिःसारण)व्यवस्था व तद्संबंधीत सीवेज पंपींग स्टेशन आणि एस.टी.पी. देखभाल दुरूस्तीसाठी तसेच मुख्यालयातील ड्रेनेज विभागाअंतर्गत होणारी ड्रेनेज दुरूस्तीची इतर सर्व कामे करून घेणेस र.रू.६६.०० लक्ष निधी वळती करणेचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**<u>संवाद :</u>**

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : हे काम महत्वाचे आहे. सर्वच वार्ड कार्यालयात मशीनरी देण्यात यावे. जुन्या मशीनरीही दुरूस्ती करण्यात यावे या दुरूस्तीसह मंजूरी देण्यात यावी.

मा.महापौर :आताच सुचना केल्या प्रमाणे दुरूस्तीसह मंजूरी देण्यात येते.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पातील पान क्रमांक डब्ल्यू-५६ वर खाली नमुद प्रमाणे तरतुद र.रू.६६.०० लक्ष पैकी सिडको परिसरातील ड्रनेज (मलनिःसारण)व्यवस्था व तद्संबंधीत सीवेज पंपींग स्टेशन आणि एस.टी.पी. देखभाल दुरूस्तीसाठी तसेच मुख्यालयातील ड्रेनेज विभागाअंतर्गत होणारी सर्व वॉर्डातील जलनिस्सारणाची व जून्या ड्रेनेज लाईन दुरूस्तीची इतर सर्व कामे करून घेणेस र.रू.६६.०० लक्ष निधी वळती करणेस मान्यता देण्यांत येते.

| अ.क्र. | पा.क्र. | कामाचे नांव | तरतुद (लाखात) |
|---|---|---|---|
| १० | W-५६ | सिव्हर रॉडींग व पॉवर बकेट यंत्राव्दारे वार्षीक पध्दतीने करावयाची देखभाल सहा वार्डासाठी प्रत्येकी र.रू.५.०० लक्ष व उर्वरीत या विभागासाठी. | ३३.०० |
| १५ | W-५६ | सिव्हर रॉडींग व पॉवर बकेट यंत्राव्दारे वार्षीक पध्दतीने करावयाची देखभाल दुरूस्ती. | ३३.०० |
| | | **एकुण रू.** | **६६.००** |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. ३७१ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील नाल्यातून वाहणाऱ्या मैलापाणी व सांडपाण्यावर प्रक्रिया करणेसाठी ग्रिन ब्रिज टेकनॉलॉजीचे प्रात्यक्षिक करणे. या कामासाठी अर्थसंकल्प २००८.०९ मध्ये ऑक्सीडेशन पॉंड/एस.टी.पी. दुरूस्ती या लेखाशिर्षा खाली पान क्रमांक डब्ल्यू-५८, अ.क्र.१, वर र.रू.१०.०० लक्ष तरतुद करण्यात आली आहे. सदर प्रात्यक्षिक तुर्त न करण्याचे ठरले आहे.

हर्सुल/जाधववाडी परिसरातील मयुर पार्क ते पिसादेवी रस्ता आणि त्यापुढील जलनिःसारण वाहीनी नादुरूस्त असल्याने परिसरात सांडपाणी साचून दुर्गंधीचा त्रास होत आहे. तसेच त्या परिसरातील नागरीकांचे आरोग्य धोक्यात येण्याची शक्यता नाकारता येत नाही. प्रस्तुत कामासाठी विभागाने तरतुद प्रस्तावीत केली होती परंतू अर्थसंकल्पात उपलब्ध झालेली नाही. या कामाचे अंदाजपत्रक तयार असून निधी अभावी काम झालेले नाही.

सदर काम करणे अत्यंत आवश्यक असल्याने अर्थसंकल्प पुस्तीका सन २००८-०९ पान क्रमांक डब्ल्यू-५८,अ.क्र.१,वरील उपलब्ध तरतुद र.रू.१०.०० लक्ष मयुरपार्क ते पिसादेवी रस्ता पर्यंतची मुख्य जलनिःसारण वाहीनी आणि परिसरातील वाहीन्या दुरूस्ती करणेच्या कामासाठी वळती करणेचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर : विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अर्थसंकल्प पुस्तीका सन २००८-०९ पान क्रमांक डब्ल्यू-५८, अ.क्र.१,वरील उपलब्ध तरतुद र.रू.१०.०० लक्ष मयुरपार्क ते पिसादेवी रस्ता पर्यंतची मुख्य जलनि:सारण वाहीनी आणि परिसरातील वाहीन्या दुरूस्ती करणेच्या कामासाठी वळती करणेस मान्यता देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३७२ :**

मा.आयुक्त महानगरपालिका प्रस्ताव सादर करीत आहेत की, महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेचे ५० वर्ष सन २०१० मध्ये पूर्ण होत आहे. त्या निमित्ताने महाराष्ट्र राज्य सुवर्ण जयंती वर्ष २०१०-११ सुजल व निर्मल अभियान राबविण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. या अभियानाअंतर्गत सन २०१०-११ पर्यंत नागरी पाणी पुरवठा, मलनि:सारण,शौचालय बांधकाम व घनकचरा व्यवस्थापनासंदर्भात पर्याप्त गुणवत्तापूर्ण सेवा, किफायतीशीर सेवाशुल्कामध्ये उपलब्ध करून देणे व विविध तांत्रिक,आर्थिक व व्यवस्थापकीय सुधारणा करण्याचे उद्दिष्ट्य निर्धारित केलेले आहे. याकरिता महाराष्ट्र शासनाने दिनांक २२ ऑक्टोबर २००८ रोजी शासन निर्णय प्रसिध्द केलेला आहे.

या अभियानांतर्गत नागरी पाणीपुरवठा व मलनि:सारण योजनांसाठी सुधारीत वित्तीय आकृतीबंध तयार केला असून बृहमुंबई महानगरपालिका व २० लाखापेक्षा अधिक लोकसंख्येच्या महानगरपालिका वगळून उर्वरीत महानगरपालिका करिता ७०% अनुदान,२०% कर्ज व १०% नागरी संस्थांचा सहभाग नमूद केलेला आहे. या आदेशानुसार पूर्वीचे मंजूर केलेले अनुदान रद्द करण्यात येवून ते अनुदान सुधारीत आकृतीबंधानुसार वाढीव अनुदान म्हणून परिगणना करण्यात येईल.

या योजनेचा लाभ JNNURM व UDSSMT अंतर्गत योजना मंजूर असलेल्या नागरी संस्थांना घेता येणार नाही. त्याचप्रमाणे योजनेचा लाभ घेवू इच्छिणाऱ्या संस्थांना विविध तांत्रिक, आर्थिक व व्यवस्थापकिय सुधारणा नागरी संस्थांनी करण्यासाठी सुधारणांचे मुद्दे (Reforms) देखील नमूद केलेले आहेत. तसेच अनुदान प्राप्त करावयाचे असल्यास सुधारणा (Reforms) करणे बंधनकारक करण्यात आले आहे. या सुधारणातंर्गत पाणीपुरवठा,सांडपाणी व मलनि:सारण,शौचालय बांधकाम व घनकचरा व्यवस्थापक यांतील सुधारणांचा समावेश असून या सुधारणा सुजल व निर्मल अभियानाच्या अविभाज्य भाग राहणार आहेत, तसेच ज्या संस्था या सुधारणा करणार नाही अशांना यापूढे पाणीपुरवठा व स्वच्छता अंतर्गत कोणतेही अनुदान अनुज्ञेय होणार नाही.

वाढीव अनुदान अनुज्ञेय होण्यासाठी नागरी संस्थांना सर्वप्रथम सुधारणात्मक उपाययोजना स्विकारण्यासाठी व त्या पूर्ण करण्यासाठी राज्य शासनाशी करार (MOA) करावा लागेल. शासन स्तरावर सुधारणांची सुरूवात व टप्पेनिहाय साध्य याचा आढावा घेतला जाणार आहे. ज्या संस्था विहीत वेळेत सुधारणा करणार नाहीत त्यांच्या योजनेची मंजूरी रद्द करण्यात येवून दिलेले अनुदान वसूल करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे भविष्यात संबंधीत नागरी संस्थेच्या पाणी पुरवठा व मलनि:सारण प्रकल्पास मंजूरीचा विचार होणार नाही. BOT तत्वावरील योजनांसाठी व्हॉयबेलिटी गॅप फंडीगच्या प्रमाणाचा निर्णय शासनद्वारे घेण्यात येईल. योजनेच्या कामाचे समन्वय तसेच सुधारणात्मक उपाययोजना यासाठी नागरी संस्थांना तांत्रिक व व्यवस्थापकीय सल्लागाराची नेमणूकीची मुभा देण्यात आली आहे.

सुधारणात्मक उपाययोजनांकरीता करावयाच्या कार्यवाहीचा कालावधी व नागरी संस्थांनी केलेले कार्य हे वाढीव अनुदानाचे मानक असतील.

**नागरी संस्थांनी करावयाच्या उपाययोजना खालीलप्रमाणे आहेत.**

अ) **नागरी पाणी पुरवठा व्यवस्थापन :-**

१. शहरातील अवैध नळजोडण्या शोधून नियमित करणे तसेच सार्वजनिक नळखांबाचे गटजोडण्यामध्ये रूपांतरण करणे.

२. पाण्याची बिलींग व वसुलीची १००% व्यवस्था निर्माण करणे.

३. योजनेचे पाणी लेखापरिक्षण / उर्जा लेखापरीक्षण व पुनर्वसन कार्यक्रम घेणे, सद्यष्य गळत्या सुधारणे, पुनर्वसनाचा व योजनेच्या वाढ वृध्दीचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे.

३.१.ठोकपाणी पुरवठ्याचे मोजमाप होण्यासाठी योजनेच्या विविध पुरवठा स्तरावर फ्लोमीटर्स लावणे.

१.२ बिलींग,वसुली,पंपीग केंद्र तसेच योजनेचे व्यवस्थापन खाजगी संस्थाच्या सहभागाने करणे.

४. पाणी पुरवठ्याचे प्रमाणे/तास वाढविणे.

५. पूर्ण देखभाल दुरूस्ती खर्च व घसारा अंतर्भूत करून पूर्ण पाणी खर्चावर आधारीत दर आकारणी करणे.

६. स्थानिक संस्था व खाजगी संस्थेच्या सहभागातून किंवा पूर्ण खाजगी सहभागातून मिटर्स बसविणे.

७. कर्ज व पाणीपट्टीची थकबाकी भरण्यासाठी नविन सुधारीत निर्भय योजनेत भाग घेणे.

८. पाणी पुरवठ्यासंबंधी नागरीकांच्या तक्रार निवारण यंत्रणा स्थापन करून निवारणाची १००% उद्दिष्ट गाठणे.

९. जलशुध्दीकरण केंद्र / पंपीग स्टेशन तसेच वितरण व्यवस्थेमधील पाण्याची गुणवत्ता योग्य राहण्यासाठी विशिष्ट पध्दत अवलंबणे व गुणवत्तेसाठी योग्य उपाययोजना करणे.

१०. ठोकपाणी पुरवठ्याचे मोजमाप होण्यासाठी योजनेच्या विविध पुरवठा स्तरावर फ्लोमीटर्स लावणे.

११. बिलींग,वसुली,पंपीग केंद्र तसेच योजनेचे व्यवस्थापन खाजगी संस्थाच्या सहभागाने करणे.

१२. नागरी पाऊस पाणी संकलनासाठी उपविधी करणे तसेच पाऊस पाणी संकलनासाठी प्रोत्साहनपर सवलत देणे.

ब) **<u>सांडपाणी व मलनि:सारण व्यवस्थापन :-</u>**

१. शहरातील मालमत्ता सिवरेजने जोडणे.

२. शहरातील मालमत्ता सलेजने जोडणे.

३. शहरातील मालमत्ता ड्रेनेजने जोडणे.

४. शहरात निर्माण होणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करून त्याचा पुनर्वापर करणे.

५. नागरीकांकडून सांडपाणी व मलनि:सारण शुल्क आकारणे.

६. अस्तित्वातील व्यवस्थेमध्ये सुधारणा किंवा वाढवृध्दी करण्यासाठी उपाययोजना करणे.

७. सांडपाण्याची प्रक्रीया पूर्व व नंतर तपासणी करून बीओडीचे प्रमाण कमी करणे.

क) **<u>घनकचरा व्यवस्थापन :-</u>**

१. घनकचऱ्याचे सेंद्रिय व असेंद्रीय कचऱ्यामध्ये वर्गीकरण करण्याबाबत नागरीकांना प्रवृत्त करणे व बंधनकारक करणे.

२. वर्गीकृत कचरा घराघरातून गोळा करण्यासाठी घंटागाडी व्यवस्था अंमलात आणणे.

३. घनकचऱ्यावर प्रक्रीया करण्यासाठी व्यवस्था निर्माण करणे. (कंपोस्ट/गांडुळखत)

४. हाऊसिंग कॉलनी,अपार्टमेंट व संकुलानी तेथे निर्माण होणारा कचरा बाहेत न दता स्वत:विकेंद्रीत पध्दतीने गांडुळखत करणे किंवा तत्सम तंत्रज्ञान वापरून कचऱ्याची विल्हेवाट लावणे.

५. भाजी मंडई,मटनमार्केट,हॉटेल्स इत्यादी ठिकाणी निर्माण होणारा कचरा दररोज निश्चित वेळी उचलणे व रस्ते सार्वजनिक ठिकाणी स्वच्छ करण्याची व्यवस्था निर्माण करावी.

६. घनकचऱ्यापासून खत,गॅस व वीज निर्मितीपासून नागरी संस्थेस मुल्यनिर्मिती करणे व यासाठी खाजगी संस्थांचा सहभाग घेणे.

७. घनकचरा व्यवस्थापनासाठी नागरीकांकडून शुल्क आकारणी करणे व त्याची प्रभावी वसूली करणे.

८. कचरा भूमीभरणाची व्यवस्था निर्माण करणे.
९. शहरात निर्माण होणारा कचरा विविध साठवण स्थळावरून नेण्यासाठी सक्षम वाहतुक व्यवस्था करणे.

ड) **शौचालय व्यवस्थापन :-**

१. शहरातील वैयक्तिक व सार्वजनिक शौचालय उपलब्धतेचे सर्वेक्षण करणे.
२. सर्वेक्षणाच्या आधारे शौचालय सुविधा वाढविण्यासाठी कृती आराखडा तयार करणे व अर्थसंकल्पात आवश्यक तरतूद करणे.
३. शहरातील नादुरूस्त सार्वजनिक ठिकाणच्या शौचालयाची दुरूस्ती करणे.
४. झोपडपट्टीमध्ये असलेल्या शौचालयाची प्राधान्याने दुरूस्ती करून वाढीव शौचालये बांधण्याचे काम हाती घेणे.
५. शहरामध्ये महिलांसाठी असलेल्या सार्वजनिक शौचालयाची दुरूस्ती व पर्याप्त शौचालयाचे बांधकाम करणे.
६. शहरातील शाळांमध्ये असलेल्या (शासकीय/निमशासकीय) शौचालयाची दुरूस्ती व वाढवृध्दी. शहरातील सार्वजनिक शौचालयाच्या कार्यक्षम देखभाल व दुरूस्तीसाठी खाजगी (BOT/BOO) किंवा सेवाभावी संस्थाचा सहभाग घेणे.
७. शहरातील सार्वजनिक शौचालये सांडपाणी व्यवस्थेशी जोडणे.
८. वैयक्तिक शौचालये सांडपाणी व्यवस्थेशी जोडणे.
९. उघड्यावर बसण्याची पध्दत बंद करणे.

उपरोक्त सुधारणांसाठी प्रत्येक टप्पेनिहाय तीन महिन्यांची मुदत असून प्रथम टप्प्यातील (कालावधीत) झालेल्या सुधारणांचा आढावा घेतल्यानंतरच योजनेकरीता मंजूर असलेल्या वाढीव अनुदानाचा पहिला हप्ता अनुदेय राहील तसेच हीच पध्दत अंतिम हप्त्यापर्यंत अंमलात आणली जाणार आहे. सुधारणा करण्यासाठी अंतिम मुदत ही २०१०-११ ही आहे.

महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियानाचे संनियंत्रण व समन्वयन करण्यासाठी मा.प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय,मुंबई यांचे अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय समीतीचे गठण करण्यात आलेले आहे.

नागरी संस्थांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत नमुद केलेले आहे.

१. एक महिन्याच्या आत सर्वसाधारण सभेपूढे शासननिर्णय अवलोकनार्थ ठेवून त्याच्या अंमलबजावणीचा दृष्टीकोण स्विकारावा.
२. परिशिष्ट (१) मध्ये दर्शविलेल्या सुधारणात्मक उपाय योजना स्विकारण्यासाठी व त्या पूर्ण करण्यासाठी आवश्यक तो ठराव करून राज्य शासना बरोबर दोन महिन्याचे आत करात (MOA) करावा.
३. परिशिष्टामध्ये नोंदविलेल्या चारही विषया बाबतची मुद्यानुरूप सद्यस्थिती तयार करून तसेच या बाबतच्या सुधारणा करण्यासाठी नागरी संस्थांनी कृती आराखडा (hard & soft copy) शासनास तसेच जिल्हाधिकारी यांना सादर करावा.
४. परिशिष्ट १ नुसार पाणी पुरवठा,मलनिःसारण,शौचालय बांधकाम व घनकचरा व्यवस्थापन इत्यादीबाबत करावयाच्या सुधारणा या स्थानिक संस्थेतील विविध विभागाशी संबंधीत असल्याने या सर्व विषयांचे समन्वयन करण्यासाठी महानगरपालिका आयुक्त यांनी उपायुक्त अथवा कार्यकारी अभियंता यांना नियुक्त करावे.

करीता शासननिर्णयानुसार सुधारणात्मक उपाययोजना स्विकारण्यासाठी व राबविण्यासाठी तसेच शासनाबरोबर आवश्यक तो करार (MOA) करण्यासाठीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेपूढे मान्यतेस्तव सादर.

तसेच औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेकरीता सांगली-मिरज-कुपवाडा महानगरपालिकेने पारीत केलेल्या ठरावानुसार लातुर नगरपालिकेच्या धर्तीवर औंगाबाद महानगरपालिकेने सुधारणात्मक उपाययोजना राबविण्याबाबत शासनाचे निर्देश आहेत. त्यानुसार पाणीपुरवठा योजनेकरीता पहिल्या तीन वर्षासाठी मक्तेदार नियुक्त करून,त्यांच्या मार्फत प्रत्येक घरटी मिटर बसविणे,त्यांचे रिडींग घेणे, पाणी बिलाची वसूली करून महापालिकेत जमा करणे, तसेच दैनंदिन देखभाल / दुरूस्ती आणी पाणी गळतीची कामे करणे इत्यादी बाबतची जबाबदारी संबंधीत मक्तेदाराची राहील. या मक्तेदाराने पाण्याची गळती तपासणी करणे, तसेच बल्क वॉटर मिटर बसविणे, योजना राबविणे, शक्य असल्यास स्काडा (SCADA) या अत्याधुनिक तंत्राचा वापर करून ऑनलाईन सिस्टीम बसविणे या करीता जाहीर निविदा मागवून कार्यवाही करणे इत्यादी बाबी प्रस्तावित आहेत.

करीता वरिलप्रमाणे कार्यवाही करण्यासाठीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेपूढे विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.

**टिप :** या संदर्भात शासन निर्णय दिनांक २२/ऑक्टोबर/२००८ माहितीसाठी सोबत जोडला आहे.

**संवाद :**

डॉ.भागवत कराड :विषय मोठा असून सोबत शासनाचा जीआर दिलेला आहे. यावर अभ्यास करण्यासाठी वेळ द्यावा पुढील बैठकीत ठेवण्यात यावा.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:जो यात उल्लेख केला यात हे शहर येत नाही. २०११मध्ये येईल असे नमूद केले. या शहरासाठी ही योजना लागू पडत नाही.

डॉ.भागवत कराड :इतर महापालिकेत सुध्दा हा जी.आर शासनाचा गेलेला असेल त्या महापालिकेने या योजनेत येण्यासाठी काय भुमिका घेतली याची माहिती घेण्यासाठी नगरसेवक किंवा पदाधिकारी आपण आपल्या अधिकाराखाली पाठवावे पुढील सभेत हा विषय घेण्यात यावा.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय: पाण्याची वसूली महापालिकेकडेच ठेवावी ते यातून ड्रॉप करावे बीओटीवर देणार नाही असे निर्णय घेतला असतांना ही सेवा देत आहे पाण्याची सर्वीसेस दिल्यास खाजगी एजन्सीचे लोक येतील नागरीकाचे दररोज नळ कट करतील नगरसेवकांना त्रास होईल सर्वच कामे खाजगी एजन्सीकडे दिल्यास महापालिकेकडे कामे राहणार नाही असे होवू नये.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :शासनाने १०० कोटी दिले ते खर्च करणार असेल तर या बाबतीत पुर्नविचार करणे आवश्यक आहे.शासनाने जीआर काढलेला आहे. जळगाव,नाशिक, पुणे,पिपंरी-चिचवड नजीकच्या महापालिकेत जावून माहिती घ्यावी त्यानंतर पुढील बैठकीत हा विषय घेण्यात यावा.

मा.महापौर :अत्यंत महत्वाचा विषय असून महत्वाचा निर्णय घ्यायचा आहे. इतर महापालिकेने या संबंधी काय भुमिका घेतली हे बघणे गरजेचे आहे शहर विकासासाठी या सभागृहात सर्व सदस्यांनी उपस्थित असणे आवश्यक आहे. सर्वच सदस्यांना यावर चर्चा करण्याची संधी मिळाली पाहिजे आज बरेच स.सदस्य उपस्थित नाही. पदाधिकारी गट नेते सुचवतील अशा चार स.सदस्यांना इतर महापालिकेत या विषयी माहिती घेणेसाठी पाठवून तेथील संपूर्ण माहितीचा तपशील घेवून हा प्रस्ताव पुढील बैठकीत घेण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्तावा संबंधी पदाधिकारी,गट नेते सुचवतील अशा चार स.सदस्यांना इतर महापालिकेत या विषयी माहिती घेणेसाठी पाठवून तेथील संपूर्ण माहितीचा तपशील घेवून हा प्रस्ताव पुढील बैठकीत ठेवणेस मान्यता देण्यांत आली.

**विषय क्र. ३७३ :**

मा.आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, नेहरू भवन हॉल, पुंडलिकराव ताठे सभागृह,सिल्क मिल हॉल,उस्मानपुरा हॉल, सर सय्यद हॉल,मिर सलामी हॉल व इतर मनपा मालकीचे हॉलची भाडयामध्ये बऱ्याच दिवसापासून भाडेवाढ झालेली नाही.

तरी भाडयामध्ये खालील प्रमाणे वाढ करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कार्यालयाचे नांव | विवरण | सध्याचे भाडे | प्रस्तावित भाडेवाढ |
|---|---|---|---|---|
| ०१ | नेहरू भवन | लग्नासाठी | २२०० | ३००० |
| | | सांस्कृतिक शालेय कार्यक्रमासाठी | | |
| | | तिन तासाचे भाडे | ९५० | १२०० |
| | | सहा तासापेक्षा जास्त | ११५० | १५०० |
| | | लग्नासाठी शुल्क फक्त मैदान | ५०० | १००० |
| | | विद्युत शुल्क | - | रू.१० प्रति युनिट |
| | | अनामत लग्नासाठी | - | १००० |
| ०२ | कै.पुंडलिकराव ताठे सभागृह | लग्नासाठी हॉल/लॉन | ११००० | १५००० |
| | | स्वागत समारंभ | ६५०० | ७५०० |
| | | अनामत | ७००० | ८००० |
| | | विद्युत शुल्क | रू.७ प्रति युनिट | रू.१० प्रति युनिट |
| कार्यक्रम रद्द झाल्यास अनामत रक्कमेतून २० टक्के रक्कम कपात करून उर्वरित रक्कम परत करणे. | | | | |
| ०३ | सिल्क मिल उस्मानुपरा सर सय्यद,मिर सलामी व इतर सर्व हॉल | लग्नासाठी | ६५० | १५०० |
| | | वाढ दिवस व सांस्कृतिक कार्यक्रमासाठी | - | १००० |
| | | विद्युत शुल्क | - | रू.१० प्रति युनिट |

वरील सर्व सभागृहाचे भाडेवाढीचे प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेत सर्वानुमते विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय: लोकांनी भाडेने घेतले पाहिजे अशी वाढ करावी नेहरूभवन मध्ये सोयी सुविधा,खुर्च्या व्यवस्थित नाही. सुविधा पुरवाव्यात त्यानंतर ३०००रू भाडे करावे तुर्त लग्नासाठी रू.२२०० ऐवजी २६०० करावे.

श्री.सलीम खान मागिल एका बैठकीत नेहरूभवन येथे सोयी सुविधा देण्यासाठी आदेशीत केले होते. परंतू संबधीत अधिकारी यांकडे लक्ष देत नाही.सुविधा उपलब्ध करून दयाव्यात त्यानंतर भाडे वाढविण्याचा विचार करावा.

श्री.भगवान घडमोडे :सरसकट ५० टक्के वाढ करावी. एकदम १०० टक्के वाढ करणे जनतेवर अन्यायकारक होईल.जनता नाराज होईल व त्यांना त्रास देतो अशी भावना लोकांची होईल.

श्री.सय्यद खुसरो :अगोदर सोयी सुविधा दयाव्यात त्यानंतर भाडे वाढ करावी.नेहरूभवन येथे सुविधा नाही.

श्री.हिम्मतराव दाभाडे :सोयी सुविधा बरोबर नसतांना जास्तीचे भाडे वसूल करणे योग्य नाही.

श्री.संजय जगताप :अगोदर सोयी सुविधा पुरवाव्यात त्यानंतर भाडे वाढवावे नेहरूभवन येथे लाईट ,माईक, खुर्च्या तुटलेल्या आहेत येथे दलित , मुस्लीम समाजाचे लोक लग्नासाठी कमी रक्कम असल्यामूळे भाडेने घेतात.

श्री.सलीम खान :भारताचे पहिले पंतप्रधान यांचे नावाने नेहरूभवन ही शहरातील जुनी वास्तू आहे.सोयी सुविधा अगोदर द्याव्यात नंतर भाडेवाढ करण्याचा विचार करावा.

श्री.मनमोहनसींग ओबेरॉय:बीओटीवर देवू नये अशी अटी यात असावी.भाडे वाढ करून बीओटीवर देण्याचे बंद करावे.

श्री.वसंत नरवडे :शहरातील इतर ठिकाणच्या प्रमाणे या ठिकाणी वॉटर कुलर,कॅन्टींगची लाईट , माईकची व्यवस्था यावर खर्च करून ५० टक्के भाडे वाढवावे.

श्री.भाउसाहेब ताठे :ताठे सभागृहाचे भाडे ११००० दाखवले परंतू ऑलरेडी १३०००रू भाडे घेतो.भाडे वाढ करू नये. त्या सभागृहापासून महापालिकेला गेल्या तीन वर्षात २०-२५ लक्षचा फायदा झाला ५० हजार सुध्दा देखभाल दुरूस्तीसाठी खर्च केले नाही.जी रक्कम भाडेपोटी आली त्यातून २५ टक्के रक्कम ही या सभागृहावर प्रशासनाने खर्च करावी भाडे वाढ करू नये.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :महत्वाच्या व किमंती वास्तू आहे. भाडे वाढविणे हे नॉमीनल आहे परंतू त्या ठिकाणी पाणी व इतर सुविधा असणेही आवश्यक आहे.सर्व सुविधा देवून ही भाडे वाढ योग्य असेल तर वाढवावी जास्त तफावत न ठेवता सर्वच ठिकाणचे सरसकट भाडे वाढ करावी.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:सरसकट २५ टक्के वाढ करण्यात यावी.या ठिकाणी सर्व सोयी सुविधा मिळतील याकडे मा.महापौर मा.सभापती स्थायी समिती यांनी लक्ष दयावे.

डॉ.भागवत कराड :सर्व समान २५ टक्के भाडे वाढ करावी. सर्व सुविधा तेथे देण्यात याव्यात.

मा.महापौर :सर्व सदस्यांच्या भावना लक्षात घेवून एवढी वाढ करणे योग्य नाही. सर्वसामान्य कुटूंबांना याचा फायदा होतो हे लक्षात घेवून यात फक्त २५ टक्के वाढ करण्यात येते या दुरूस्तीसह मंजूर करण्यात येते वाढ ही मुळ रक्कमेवर राहील. या ठिकाणी सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार नेहरूभवन, कै.पुंडलिकराव ताठे सभागृह, सिल्कमिल,ऊस्मानपुरा,सर सय्यद मिरा सलामी व इतर सर्व हॉलचे प्रशासनाकडून प्रस्तावित केलेल्या भाडेवाढी ऐवजी विद्यमान भाड्यावर २५ % वाढ करणे या दुरूस्तीसह प्रस्तावास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३७४ :**

मा.आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, संत एकनाथ रंग मंदीर भाडयामध्ये तसेच नियमावली मध्ये बऱ्याच दिवसापासून वाढ/बदल झालेला नाही. तरी भाडया मध्ये तसेच नियमावली मध्ये खालील प्रमाणे वाढ व बदल करण्यात येत आहे.

| अ.क्र | विवरण | सध्याचे भाडे | प्रस्तावित भाडे वाढ | सार्वजनिक सुट्टीचे भाडे | प्रस्तावित भाडे वाढ |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | नाटक<br>ऑकेस्ट्रा व इतर कार्यक्रम अनामत रक्कम | १८००/-प्र.स.<br>२५००/-प्र.स.<br>२५००/- | ३५००/-प्र.स.<br>४०००/-प्र.स.<br>५०००/-प्र.स. | १९००/-प्र.स.<br>२६००/-प्र.स. | ३७००/-प्र.स.<br>४२००/-प्र.स. |
| ०२ | विश्रामगृह | १५०/-दोन व्यक्तीसाठी<br>७५/-एक व्यक्तीसाठी | २००/-दोन व्यक्तीसाठी<br>१००/-एक व्यक्तीसाठी | - | - |
| ०३ | कलादालन | १२००/-प्र.दिन<br>अनामत १०००/- | १५००/-प्र.दिन | - | - |

तसेच या व्यतिरीक्त व्यक्ती असल्यास प्रत्येक व्यक्तीला ५०/- प्रति दिवस प्रमाणे विश्रामगृहाचे भाडे द्यावे लागेल. तसेच अर्जदारांनी बाहेरून गादी आनल्यास प्रत्येक व्यक्तीस २०/-प्रति दिवस भाडे द्यावे लागेल.

अटी-शर्तीसह संत एकनाथ रंग मंदीर व कलादालन,विश्रामगृहाचे नविन भाडे वाढ तथा नियमावली दुरूस्तीसाठी चे प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेत सर्वानुमते विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**संत एकनाथ रंग मंदिर भाडयाने देण्याबाबतची**

**नियमावली**

१. संत एकनाथ रंग मंदिर एकंदर ८४६ आसने आहेत. त्याची विगतवारी खालील प्रमाणे आहे. मुख्य प्रेक्षागृहात ६०० बाल्कनीत २४६ आसने आहेत. मुख्य प्रक्षागृहात दोन आसने परिनिरीक्षक मंडळाचे प्रतिनिधीसाठी राखुन ठेवण्यात आलेले आहे. त्याचा वापर तिकिट विक्रीसाठी करता येणार नाही. परिनिरीक्षक मंडळाचे प्रतिनिधी न आल्यास आसन क्रमांक ए-५ व ए-६ रिकामे ठेवावे.

२. अर्जदाराने रंग मंदीराची मागणी त्यासाठी नश्चित केलेल्या छापील अर्जाचे नमुन्यात केली पाहिजे. रंग मंदिराचे बुकींग ३० दिवस अगोदर करता येईल.

१. नाटक कार्यालयीन वेळेचे भाडे ३५००/-व सार्वजनिक सुट्टी शनि/रवि चे ३७००/-
२. इतर कार्यक्रमासाठी -- ४०००/------ --------- ४२००/-
३. अनामत ५०००/-

३. रंग मंदिर वातानुकुलित आहे परंतू विद्युत प्रवाह खंडित झाल्यास उपलब्धतेनुसार विद्युत जेनित्राचे सहाय्याने इतर विद्युत व्यवस्था चालविली जाईल, परंतु वातानूकुलित व्यवस्था कार्यरत राहणार नाही. त्यासाठी भाडयात कोणतीही सवलत मिळणार नाही.

४. रंग मंचावर खालील प्रमाणे सोयी उपलब्ध असल्यास मिळू शकेल.
१. सायक्लोरामा व फ्रंट कर्टन
२. माईक -११ नग
३. हॅलोजन -०२ नग
४. स्पॉट लाईट -०६ नग

माइक सिस्टीम फक्त नाटकासाठी उपलब्ध करून देण्यात येईल. इतर कोणत्याही कार्यक्रमात माईक सिस्टीम मिळणार नाही.

या व्यतिरीक्त इतर साहित्य लागल्यास व ते उपलब्ध असल्याचे वेगळे भाडे घेऊन दिले जाईल परंतू अशा अतिरिक्त सहित्याची मागणी अर्जदाराने प्रयोगापूर्वी दोन तास करणे आवश्यक राहील.

फक्त एक कार्यक्रमासाठी भाडयाने घेतल्यास

| | | कंपनीने स्वतः वापरल्यास |
|---|---|---|
| ०१. हॅलोजन | ५० रू.प्रति नग | २५ रू.प्रति नग |
| ०२. पारलाईट | १००रू.प्रति नग | ५० रू.प्रति नग |
| ०३. स्पाट लाईट | ५० रू.प्रति नग | २५ रू.प्रति नग |
| ०४. स्ट्रोब लाईट | ५० रू.प्रति नग | २५ रू.प्रति नग |
| ०५. मीटर वॉल | १०० रू.प्रति नग | ५० रू.प्रति नग |
| ०६. डेकोरेटीव्ह लाईट | १०० रू.प्रति नग | ५० रू.प्रति नग |
| ०७. कॅमेरा/प्रोजेक्ट | --- | १०० रू.प्रति नग |

०५. अर्जदारास एका सत्रामध्ये नाटयगृहाचा वापर फक्त चार तास करता येईल. एक तास व्यवस्थेसाठी व ३ तासाचा कार्यक्रम एकुण चार तास वापर करता येईल. एकच कार्यक्रम करता येईल रंगमंदिराचा वापर खालील प्रमाणे करता येईल.

| | | |
|---|---|---|
| सकाळी प्रयोग | - | सकाळी १० ते २ |
| दुपारचा प्रयोग | - | दुपारी ३ ते ७ |
| रात्रीचा प्रयोग | - | रात्री ८ ते १२ |

रात्रपाळीत तमाशा व लावणी या कार्यक्रमासाठी रंगमंदिर मिळणार नाही. त्याची वेळ दुपारी ४.०० ते ८.०० वेळेत वापर करता येईल.

०६. ठरवून दिलेल्या वेळेत प्रयोग संपविण्याची जबाबदारी अर्जदारावर राहील. प्रयोग वेळेवर न संपविल्यास बंद करण्याचा अधिकार व्यवस्थापकांना राहील.

ठरवून दिलेल्या वेळेपेक्षा जास्त वापर केल्यास अर्ध्या तासाला रंगमंदिर पुढील पाळीसाठी रिकामे असल्यास रूपये ५००/-वाढीव आकार द्यावा लागेल.

०७. एकाच अर्जदारास किंवा संस्थेला एक महिन्यात ७ सात दिवसांपेक्षा जास्त कालावधीसाठी रंगमंदिर मिळणार नाही. मात्र शैक्षणिक व शासकीय संस्थांच्या बाबतीत ही अट शिथिल होऊ शकेल.

०८. अर्जदारास अनामत व भाडे आरक्षणाच्या वेळीच भरावे लागेल. जर व्यवस्थापनाने तारीख रद्द केली तर अनामत व भाडे परत करण्यात येईल. अर्जदारास दुसरी तारीख/सत्र आरक्षण करावी लागेल. जर अर्जदाराने कार्यालयीन आठ दिवस अगोदर सत्र/तारीख रद्द केल्यास अनामत ५० टक्के रक्कम परत करण्यांत येईल. आठ दिवसानंतर जर सत्र रद्द केली तर भाडयाची रक्कम परत मिळणार नाही. व अनामत रक्कम परत केली जाईल. कार्यक्रमामध्ये झालेले नुकसान भरून द्यावे लागेल.

०९. दिलेल्या मर्यादेनंतर कार्यक्रम रद्द केल्यास भाडे जप्त करण्यात येईल. आठ दिवस अगोदर भाडे न भरल्यास ती तारीख दुसऱ्यास देण्याचा अधिकार व्यवस्थापनास राहील.

१०. अर्जदाराने अर्जावर लिहिलेल्या कार्यक्रमाची रीतसर पोलीस परवानगी आणल्याशिवाय कार्यक्रम करता येणार नाही. ज्या कार्यक्रमासाठी आरक्षण केलेले आहे. तोच कार्यक्रम करणे अर्जदारावर बंधनकारक राहील. त्या कार्यक्रमात बदल करता येणार नाही. बदल केल्यास कार्यक्रम रद्द करण्यात येईल व अनामत व भाडे जप्त करण्यात येईल.

११. अर्जदारांना व्यवस्थापनाने दिलेली तारीख त्यांना आपसात आदला बदल करता येणार नाही. रीतसर पहिली तारीख रद्द करून दुसऱ्या तारखेचे नवीन आरक्षण करता येईल. असे आढळल्यास पुन्हा हया नाटयगृहाचे आरक्षण त्या अर्जदारास देऊ केले जाणार नाही.

१२. नाटयगृह आकाराची संपूर्ण रक्कम व्यवस्थापनाकडे भरल्याशिवाय अर्जदारास आगाऊ तिकिट विक्रीसाठी परवानगी दिली जाणार नाही. प्रयोगाचे तारखेपुर्वी तीन दिवस आधी तिकिट विक्रीस परवानगी दिली जाईल. आगाऊ तिकीट विक्रीच्या वेळा सकाळी ९ ते १२ सायंकाळी ५ ते ८ व प्रयोगाच्या दिवशी ९ ते प्रयोगापर्यंत राहील.

१३. तिकिट विक्री व आसन क्रमांकाच्या वितरणाची संपूर्ण जबाबदारी अर्जदारावर राहील त्यात काही चुकी झाल्यास सर्व जबाबदारी अर्जदाराची राहील. व्यवस्थापनाची जबाबदारी राहणार नाही. प्रेक्षागृहात प्रेक्षक नाचल्यास कार्यक्रम बंद करण्यांत येईल याची सर्व जबाबदारी अर्जदारावर राहील. प्रेक्षागृहात उभे राहून कार्यक्रम बघता येणार नाही.

१४. प्रयोगाच्या संदर्भात सर्व श्रमिक कायदे व शासकीय नियमाचे पालन करण्याची जबाबदारी अर्जदारावर राहील व तिकिट विक्री सुरू करण्यापुर्वी चार दिवस अगोदर नाटयगृह व्यवस्थापकांना आवश्यक तक परवाने उदा- परफॉरमन्स लायसन्स तिकिट विक्री परवाना दिल्याशिवाय तिकिट विक्री करता येणार नाही व प्रयोगही करता येणार नाही.

१५. या रंगमंदिरात होणारा कोणताही कार्यक्रम ३ तासापेक्षा जास्त काळ चालू ठेवता येणार नाही. तसेच कार्यक्रम रात्री १२ वाजेच्या आत संपवावा लागेल अन्यथा कार्यक्रम थांबविण्याचा अधिकार व्यवस्थापकास राहील.

१६. रंगमंदिरात होणाऱ्या प्रयोगामुळे कोणाचा हक्कभंग झाला किंवा काही कायदेशीर गुंतागुंत निर्माण झाल्यास किंवा कोणाच्या भावना दुखावल्या गेल्यास याची सर्व जबाबदारी अर्जदारावर राहील. व्यवस्थापनावर राहणार नाही.

१७. रंगमंदिरात जेवढया प्रेक्षकांची बसण्याची व्यवस्था केलेली आहे. त्यापेक्षा अधिक व्यक्तिंना रंगमंदीरात प्रेक्षक म्हणून प्रवेश देता येणार नाही. जर तसे झाल्यास प्रयोग बंद करण्याचा अधिकार व्यवस्थापकांना राहील. रंगमंदिरात एकही ज्यादा खुर्ची टाकू दिली जाणार नाही. रंगमंदिराच्या प्रवेश व्दाराच्या आतील भागात उपहार गृहाच्या हॉलमध्ये तसेच रंगमंदिराच्या परिसरामध्ये कोठेही प्रेक्षकांची बसण्याची व कार्यक्रम दाखविण्याची व्यवस्था करता येणार नाही. रंगमंचाशिवाय इतर कोणत्याही भागात प्रोजेक्टर (स्क्रीन) टी.व्ही.इतर ठिकाणी लावता येणार नाही. तसेच कोणताही स्टॉल रंगमंदिराच्या आवारात लावता येणार नाही.

१८. प्रयोगाच्या कालावधीत नाटयगृहाची जबाबदारी अर्जदारावर राहील व नाटयगृहाची खराबी/नुकसान होणार नाही याबाबत संपूर्ण दक्षता अर्जदारास घ्यावी लागेल. या कालावधीत झालेली नुकसान भरपाई व्यवस्थापन ठरवील व त्या दराने अर्जदारास नुकसान भरून द्यावे लागेल. नुकसान भरपाई न भरल्यास पुढची तारीख आरक्षित करता येणार नाही.

१९. नाटयगृहाचा खालील भाग अर्जदारास प्रयोगाचे कालावधीत वापरता येईल.

१. रंगपाट २. रंगमंच ३. प्रेक्षागृह ४. संबंधित मार्ग

परंतू प्रेक्षागृहा व्यतिरीक्त इतर भागात नाटय प्रयोगाशी प्रत्येक संबंधित असणाऱ्या व्यक्ति शिवाय इतर व्यक्तींना प्रवेश दिला जाणार नाही.

तसेच प्रयोगाचे कालावधीत व्यवस्थापक,महानगरपालिकेचे आयुक्त अगर त्यांनी प्राधिकृत केलेला कर्मचारी,अधिकारी यांना नाटयगृहाचे कोणत्याही भागास भेट देता येईल व त्यास अर्जदारास प्रतीबंध करता येणार नाही.

२०. नाटयगृहाचे परिसरात महानगरपालिकेने निर्धारित केलेल्या मान्यता प्राप्त मक्तेदारा व्यतिरीक्त इतर व्यक्तिंना किंवा अर्जदारास खाद्यपदार्थ,पेय,चहा,कॉफी इ.विक्री करण्यांस किंवा बाहेरून आणण्यास सक्त मनाई आहे.

तसेच प्रेक्षागृहात हे पदार्थ नेण्यास सक्त मनाई आहे. याची जबाबदारी अर्जदारावर राहील प्रेक्षागृहात घाण झाल्यास दंड म्हणून रूपये ५००/- अनामत रक्कमे मधून कपात करण्यात येईल. अर्जदाराने जर बाहेरून खाद्य पदार्थ आणले तर त्याचा प्रयोग बंद करण्याचा अधिकार व्यवस्थापनाला राहील.

२१. नाटयगृहाचे कालावधीत नाटयगृहात/रंगपटात थुंकणे,धुम्रपान करणे, मद्यपान करणे असे आक्षेपार्ह वर्तन करण्यास प्रत्यव्यय राहील व अशा वेळी सर्व जबाबदारी अर्जदारावर राहील.

२२. रंगमंदिर आरक्षण केलेल्य वेळेनुसारच उपलब्ध करून देण्यांत येईल प्रयोगानंतर आरक्षणाच्या वेळेतच रंगमंदिर रिकामे करावे लागेल.

२३. नाटयगृहातील कायक्रमाच्या वेळी जरूरी प्रमाणे पोलीस मदतीची व्यवस्था अर्जदाराने केली पाहिजे आणि ती नसेल तर कोणत्याही कारवाईसाठी पोलीस मदतीची आवश्यकता असल्यास व्यवस्थापन पोलीस मदत मागवतील व त्याचाच खर्च अर्जदारास द्यावा लागेल.

२४. रंगमंदिरात सुसज्ज रंगमंच,रंगपट,ध्वनीव्यवस्था,प्रकाश व्यवस्था,शिस्त व्यवस्था आहे आणि या सर्व तरतुदी कार्यक्षम ठेवण्याचा सर्वतोपरी प्रयत्न केला जाईल. परंतु काही अपरिहार्य कारणामुळे यात बिघाड निर्माण झाल्यास त्याची जबाबदारी रंगमंदिर व्यवस्थापनावर राहणार नाही.

२५. सम्मेलन परिसंवाद व परिषदेसाठी नाटयगृह हवे असल्यास उपलब्धतेनुसार दिले जाईल. मात्र राजकीय,धार्मीक,जातीय लग्न,लग्नाचे स्वागत समारंभ इ.करीता रंगमंदिर मिळणार नाही.

२६. अपरिहार्य कार्यासाठी कारण न देता दिलेली तारीख रद्द करण्याचा वा प्रयोग बंद करण्याचा अधिकार व्यवस्थापकास राहील.

२७. अर्जदारास कर्यक्रमाच्या वेळी रंगमंचावर कार्यक्रमा संबंधित असलेले एकच बॅनर लावता येईल. इतर ठिकाणी कोणतेही पोस्टर्स,बॅनर्स लावता येणार नाहीत.

२८. अनपेक्षितरित्या उद्‌भवणाऱ्या तांत्रिक बिघाडामुळे नाटयप्रयोग होऊ शकला नाही तर अर्जदारास भाडे परत मिळणार नाही.

२९. रंगमंदिर व्यवस्थापक हे महानगरपालिका आयुक्त व उपआयुक्त यांच्या नियंत्रणाखाली रंगमंदिराचा दैनंदिन कारभार पाहतील.

३०. या नियमाबद्दल वा मंदिराच्या उपयोगाबद्दल अर्जदार व व्यवस्थापक यांच्यात वाद उत्पन्न झाल्यास आयुक्त महानगरपालिका यांचा निर्णय अंतिम राहील. व तो दोघांवर बंधनकारक असेल.

३१. सदरचे नियम बदलणे दुरूस्त करणे अथवा जादा नियमांची भर घालणे यासाठी कोणतीही पूर्व सुचना न देता कारवाई करण्याचा अधिकार मा.आयुक्तांना राहील.

३२. तसेच लावणीसाठी संत एकनाथ रंगमंदिर दुपारी ४.०० ते रात्री ८.०० या वेळेत आरक्षीत करण्यात येईल इतर वेळेत आरक्षण मिळणार नाही.

३३. मा.खासदार,मा.आमदार,मा.महापौर,मा.सभापती तथा स.नगसेवक यांचेतर्फे कार्यक्रम आरक्षीत होत असल्यास अनामत रक्कम भरणा बाबत सवलत देणे योग्य.

३४. जनरेटरसाठी डिझेल प्रती तास ५ लिटर प्रमाणे द्यावे लागेल.

**नाटयगृहाचे विश्रामगृहाचे वापराबाबत**

औरंगाबाद महानगरपालिकेच्या नाटयगृहाचे परिसरात एकंदर पाच विश्रामकक्षाची सोय उपलब्ध आहे. एक फक्त कार्यालयीन उपयोगासाठी राखीव ठेवण्यात आलेले आहे.

दोन कक्षात दोन व्यक्तीना निवासाची सोय आहे व दोन कक्षात एका व्यक्तीच्या निवासाची सोय आहे.

**विश्रामगृहाचे वापराचे नियम खालील प्रमाणे आहेत :**

१. विश्रामगृह वापराची वेळ २४ तासांची राहील.

२. विश्रामगृहाचे २४ तासाचे भाडे दर खालील प्रमाणे :

अ दोन व्यक्तीच्या निवासाची सोय असलेले : रू.२००/-

ब एक व्यक्तीच्या निवासाची सोय असलेले : रू.१००/-

या व्यतिरीक्त व्यक्ती असल्यास प्रत्येक व्यक्तीला ५०/-प्रमाणे भाडे द्यावे लागेल तसेच अर्जदाराने बाहेरून गाद्या आणल्यास प्रत्येक व्यक्तीला रू.२० भाडे द्यावे लागेल.

३. विश्रामगृहाचा वापर करणाऱ्या व्यक्तिस भाडयाची रक्कम आगाऊ भरावी लागेल.

४. विश्रामगृहात खाद्यपदार्थ शिजवण्यास तसेच मध्यपान करण्यास सक्त मनाई आहे.

५. विश्रामगृह ताब्यात घेतांना व देतांना त्यातील साहित्याचे सुस्थिती बाबत व्यवस्थापनाकडून खात्री केली जईल व साहित्याचे नुकसान झाल्याचे आढळल्यास त्याची वसुली अर्जदाराकडून संस्थेकडून केली जाईल.

६. विश्रामगृहाचा वापर नाटयप्रयोगाशी संबंधित कलाकार व व्यवस्थापकांना नाटयप्रयोगाचे दिवशी करता येईल. परंतू एका वेळी जास्तीत जास्त ४८ तासापर्यंतच विश्रामगृहाचा वापर करू दिला जाईल.

७. दोन व्यक्तीच्या निवासाची सोय असलेले एक व एका व्यक्तीच्या निवासाची सोय असलेले एक अशा दोन कक्षाचे जिल्हाधिकारी यांना चार दिवसाच्या पूर्व सुचनेचे प्राधान्याने आरक्षण दिले जाईल. (ही सवलत बचतभवन ही वास्तु शासनाने महानगरपालिकेस हस्तांतरीत करतांना झालेल्या कराराप्रमाणे देण्यात येत आहे.)

८. शासकीय अधिकाऱ्यांना (शासकीय कामासाठी) आरक्षण दिल्यास सवलतीचे भाडे खालील प्रमाणे आकारले जाईल.

अ. दोन व्यक्तिच्या निवासाची सोय असलेले कक्ष रू.१००/-

ब. एका व्यक्तिच्या निवासाची सोय असलेले कक्ष रू. ५०/-

१०. आवश्यकता भासल्यास विश्रामगृहाचे आरक्षण रद्द करून फक्त महानगरपालिका व्यवस्थापनाच्या ताब्यात घेण्याचा अधिकार आयुक्तांना राहील.

**कलादालन**

औरंगाबाद महानगरपालिकेच्या नाटयगृहाचे परिसरात एक कलादालन उपलब्ध आहे. हौशी कलाकारांना तालमीसाठी कलादालनाचा वापर करता येईल.

१. कलादालनाचा वापर सकाळी ९ ते रात्री ९ वाजेपर्यंत करता येईल.

२. त्यासाठी अनामत रूपये १,०००/-व भाडे रूपये १५००/- प्रति दिन अर्जदारास अगोदर भरावे लागेल.

३. कलादालनाचे काही नुकसान झाल्यास अर्जदारास नुकसान भरपाई करून द्यावी लागेल. त्यानंतरच अनामत रक्कम परत केली जाईल.

४. आवश्यकता भासल्यास दिलेली तारीख रद्द करण्याचा अधिकार व्यवस्थापनाला राहील.

**संवाद :**

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : कार्यक्रम अनामत रक्कम रू.२५००/- ऐवजी रू.५०००/- असे दिले, कूणीही भरणार नाही रू.२५००/- ठेवण्यात यावे ते परत करावेच लागतात यातही २५ टक्केनी वाढ करण्यात यावी.

श्री.दिलीप गायकवाड : आजच्या बैठकीचे कामकाज शांततेत पार पडल्याबद्दल मा.महापौर व सभागृहाला धन्यवाद देतो.

मा.महापौर : कार्यक्रम अनामत रक्कम रू.५०००/- ऐवजी रू.२५००/- ठेवण्यात येते. जी वाढ आहे त्यात २५ टक्के वाढ गृहीत धरून हा विषय मंजूर करण्यात येतो. रंग कर्मींना जे चार्जेस लावले ते जास्त आहेत ते सुध्दा कमी करण्यात येते. या ठिकाणी सर्व सुविधा प्रशासनाने उपलब्ध करून द्याव्यात.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार प्रस्तावातीत अ.क्र.१ ते ३ मध्ये प्रशासनाने प्रस्तावित केलेली भाडेवाढ न करता विद्यमान दराच्या २५ % भाडेवाढ करणेस व वरिलप्रमाणे भाडेवाढीच्या दुरूस्तीस अधीन राहून संत एकनाथ रंगमंदिर भाड्याने देण्याबाबतच्या नियमावलीसही मान्यता देण्यात येते. तसेच अनामत रकमेमध्ये कोणतीही भाडेवाढ करण्यांत येत नाही इत्यादी दुरूस्तीसह सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

## स.सदस्यांचे प्रस्ताव

**विषय क्र. ३७५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.५५ कैसर कॉलनी वार्डासाठी खालील दिलेले लेखाशिर्षक बदलून हवे आहे. करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे सादर.

| पा.क्र. | अ.क्र. | तरतुद | जुने लेखाशिर्ष | नवीन लेखाशिर्ष |
|---|---|---|---|---|
| W-१२७ | ३४ | २ लक्ष | प्र.क्र.५५ कैसर कॉलनी मधील विविध गल्ल्यांमध्ये पेव्हिंग ब्लॉक बसविणे. | प्र.क्र.५५ कैसर कॉलनी ड्रेनेज लाईन दुरूस्ती करणे मनपा हजेरी केंद्र दुरूस्ती करणे मनपा दवाखाना दुरूस्ती करणे कचरा कुंडी व इतर दुरूस्तीची फुटकळ कामे करणे. र.रू.२ लक्ष |

सुचक : श्री.सलीम समशेर पटेल अनुमोदक :श्री.हाजी शेरखान

मा.महापौर : विषय क्र.३७५ ते ३७९ मंजूर करण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.५५ कैसर कॉलनी वार्डासाठी खालीलप्रमाणे अर्थसंकल्पात असलेल्या कामाचे लेखाशिर्ष बदलणेस मान्यता देण्यांत येते.

| पा.क्र. | अ.क्र. | तरतुद | जुने लेखाशिर्ष | नवीन लेखाशिर्ष |
|---|---|---|---|---|
| W-१२७ | ३४ | २ लक्ष | प्र.क्र.५५ कैसर कॉलनी मधील विविध गल्ल्यांमध्ये | प्र.क्र.५५ कैसर कॉलनी ड्रेनेज लाईन दुरूस्ती करणे मनपा हजेरी केंद्र दुरूस्ती करणे मनपा |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | पेव्हिंग ब्लॉक बसविणे. | दवाखाना दुरूस्ती करणे कचरा कुंडी व इतर दुरूस्तीची फुटकळ कामे करणे. र.रू.२ लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३७६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, बुध्द लेणी परिसरात नवीन बांधलेले खुले रंगमंचास कालकथीत शाहीर श्री.उत्तमराव सदाशिवराव जगताप यांचे नाव देण्यात यावे.

करीता मा.सर्वसाधारण सभेत ठराव मंजुरीस्तव सादर.

सुचक : सौ.विजया संजय बनकर, श्री.नाहदी नासेर म.याहीया, श्री.डॉ.भागवत कराड

अनुमोदक : श्री.अशरफ युनूस मोतीवाला, श्री.इब्राहीम पटेल, श्री.रशीद खान (मामु)

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, बुध्द लेणी परिसरात नवीन बांधलेले खुले रंगमंचास कालकथीत शाहीर श्री.उत्तमराव सदाशिवराव जगताप यांचे नाव देण्यास मान्यता देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३७७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, जळगांव टी पॉईंट लगत दक्षिणेला असलेल्या हरित पट्टयामध्ये माजी मुख्यमंत्री स्व.वसंतराव नाईक यांचा पुर्णाकृती पुतळा उभारलेला असून सदर पुतळयाच्या देखभालीची जबाबदारी आणि पुतळया लगत हरीतपट्टयाचा विकास करून संरक्षण करण्याची जबाबदारी वसंतराव नाईक शिक्षण प्रसारक मंडळ स्विकारण्यास तयार आहे. तसे त्यांनी लेखी स्वरूपात संमती पत्रही दिलेले आहे. तरी माजी मुख्यमंत्री स्व.वसंतराव नाईक यांचा पुतळा व त्यालगतचा हरितपट्टयाचा परिसर देखभाल दुरूस्तीसाठी वसंतराव नाईक शिक्षण प्रसारक मंडळ, औरंगाबाद यांना महानगरपालिकेच्या नियमित अटी शर्तीस अधिन राहून देण्यास प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.प्रशांत देसरडा

अनुमोदक : श्रीमती जयश्री किवळेकर, श्री.डॉ.भागवत कराड, श्री.सिताराम सुरे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जळगांव टी पॉईंट लगत दक्षिणेला असलेल्या हरित पट्टयामध्ये माजी मुख्यमंत्री स्व.वसंतराव नाईक यांचा पुर्णाकृती पुतळा उभारलेला असून सदर पुतळयाच्या देखभालीची जबाबदारी आणि पुतळया लगत हरीतपट्टयाचा विकास करून संरक्षण करण्याची जबाबदारी वसंतराव नाईक शिक्षण प्रसारक मंडळ स्विकारण्यास तयार असल्यामूळे व तसे त्यांनी लेखी स्वरूपात संमती पत्र दिलेले असल्यामूळे,माजी मुख्यमंत्री स्व.वसंतराव नाईक यांचा पुतळा व त्यालगतचा हरितपट्टयाचा परिसर देखभाल दुरूस्तीसाठी वसंतराव नाईक शिक्षण प्रसारक मंडळ, औरंगाबाद यांना महानगरपालिकेच्या नियमित अटी शर्तीस अधिन राहून देण्यास मान्यता देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३७८ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, कै.श्री.लक्ष्मीकांतराव लाखकर हे माजी आय.ए.एस अधिकारी असून १९८० साली बीड जिल्हयाच्या जिल्हाधिकारी पदावरून सेवानिवृत्त झालेले आहेत.

हैद्राबाद मुक्ती संग्रामात त्यांचा अप्रत्यक्ष सहभाग राहिलेला आहे. १९७२ च्या दुष्काळात सहाय्यक आयुक्त,महसुलपदी औरंगाबाद येथे केलेल्या कामाबद्दल शासनाने त्यांना नावाजलेले आहे. तसेच १९७८ साली झालेल्या मराठवाडा विद्यापीठ नामांतर आंदोलनात जिल्हाधिकारी पदावर त्यांनी केलेल्या कामाबद्दल रामधन समितीने त्यांचा गौरवपूर्ण उल्लेख केलेला आहे.

उर्दु भाषेवर अत्यंत चांगले प्रभुत्व असलेले औरंगाबाद शासकीय विज्ञान महाविद्यालयाचे तसेच उस्मानिया महाविद्यालय, हैद्राबादचे विद्यार्थी असलेले श्री. लक्ष्मीकांतराव लाखकर हे मराठवाडयाचे भूषणच आहेत.

त्यांच्या उपरोक्त कार्याचा विचार करता,पैठणगेटकडून निराला बाजारकडे जाणाऱ्या रस्ता आणि रॉक्सी सिनेमाकडून निराला बाजारकडे जाणारा रस्ता म्हणजेच पैठणगेट ते निराला बाजार (बाबुराव काळे चौका पर्यंत) या रस्त्याला कै.लक्ष्मीकांतराव लाखकर मार्ग असे नांव देण्यात यावे.

सुचक : सौ.अंजली कोंडेकर, श्री.सिताराम सुरे

अनुमोदक :श्री.अ.साजेद अ.सत्तार,श्री.अशरफ मोतीवाला,
श्री.किशारे तुलसीबागवाले,श्री.प्रशांत देसरडा

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पैठणगेटकडून निराला बाजारकडे जाणारा रस्ता आणि रॉक्सी सिनेमाकडून निराला बाजारकडे जाणारा रस्ता म्हणजेच पैठणगेट ते निराला बाजार (बाबुराव काळे चौका पर्यंत) या रस्त्याला कै.लक्ष्मीकांतराव लाखकर मार्ग असे नांव देणेस मान्यता देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३७९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.५० सुराणानगर या वॉर्डात जालना रोड महेशनगर कॉर्नरच्या उत्तरेला सद्या असलेले अपेक्स हॉस्पीटलपर्यंत अनेक दवाखाने, प्रसुतीगृह,बालरोग चिकित्सालय,प्रयोगशाळा असून उर्वरीत भाग हा पूर्णतः निवासी भाग आहे. या भागात कायमस्वरूपी शांततामय वातावरण असणे आवश्यक आहे. त्यामूळे रूग्णांना त्रास होणार नाही. त्यासाठी जालना रोड महेशनगर ते सेव्हनहीलपर्यंत,पश्चिमेला महेशनगर ते बायजीपुरा ६० फुट रूंद विद्यमान विकास योजना रस्ता,नियोजीत ८० फुट विकास योजना रस्त्यापर्यंत, उत्तरेला बसैय्येनगर ले-आऊटमध्ये चौधरी यांचे प्लॉट पासून ते एम.जी.एम.८० फुट विकास रस्ता व्हाया मोतीवालानगर आणि पूर्वेस हॉटेल सहारा लगत ८० फुट रस्त्यापासून सेव्हनहील पुलापर्यंत १०० फुट विद्यमान रस्ता या आतील भागात शांतता परिसर (Silence Zone) घोषित करण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजूरीस्तव सादर.

सुचक : श्री.प्रशांत देसरडा अनुमोदक : श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर,श्री.सीताराम सुरे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.५० सुराणानगर या वॉर्डात जालना रोड महेशनगर ते सेव्हनहील पर्यंत,पश्चिमेला महेशनगर ते बायजीपुरा ६० फुट रूंद विद्यमान विकास योजना रस्ता, नियोजीत ८० फुट विकास योजना रस्त्यापर्यंत, उत्तरेला बसैय्येनगर ले-आऊटमध्ये चौधरी यांचे प्लॉट पासून ते एम.जी.एम.८० फुट विकास रस्ता व्हाया मोतीवालानगर आणि पूर्वेस हॉटेल सहारा लगत ८० फुट रस्त्यापासून सेव्हनहील पुलापर्यंत १०० फुट विद्यमान रस्ता या आतील भागात शांतता परिसर (Silence Zone) घोषित करण्यास मान्यता देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

## पुरवणी विषय

**विषय क्र. ३८० :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, माजी आमदार मा.श्री.श्रीकांत जोशी यांच्या स्थानिक विकास निधीतून औरंगाबाद अशोका लेआऊट मध्ये स्व.प्रमोदजी महाजन सभागृह बांधण्यात आलेले आहे. सदरील सभागृह औरंगाबाद मराठी पत्रकार संघाला निःशुल्क दरात देण्यात यावे. कारण मराठी पत्रकार संघ सामाजिक,सेवाभावी दृष्टीकोन ठेवून सामाजिक उपक्रम राबवित असतो. पत्रकार संघाला शहरात कुठेही स्वतःची वास्तु नाही. त्यामुळे येथील सर्वच दैनिक आणि इलेक्ट्रॉनिक्स मीडीयाच्या पत्रकारांना पत्रकार परिषद,वार्तालाप आदी उपक्रम राबविण्याच्या दृष्टीकोनातून स्व.प्रमोदजी महाजन सभागृह निःशुल्क उपलब्ध करून देण्याचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

सुचक : श्री.डॉ.भागवत कराड अनुमोदक : श्री.प्रशांत देसरडा, श्री.कैलास गायकवाड

मा.महापौर : विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, माजी आमदार मा.श्री.श्रीकांत जोशी यांच्या स्थानिक विकास निधीतून बांधण्यात आलेले औरंगाबाद अशोका लेआऊट मधील स्व.प्रमोदजी महाजन सभागृह हे महानगरपालिकेच्या नियमित अटी व शर्तीस अधिन राहुन तसेच महानगरपालिकेच्या कार्यक्रमासाठी विनाशुल्क उपलब्ध करून देणे व याची पूर्ण मालकी महानगरपालिकेची राहील,इ.सह औरंगाबाद मराठी पत्रकार संघाला नि:शुल्क दरात उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३८१ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वॉर्ड क्र.११ मधील कामासाठी तरतूदीत खालील दर्शविल्याप्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यांत यावे.

| अ.क्र./पान क्र. | कामाचे नांव | सुधारीत कामाचे नांव |
|---|---|---|
| १८ डब्ल्यु-८७ डब्ल्यु-८९ | वॉर्ड क्र.११ कॉंक्रीट व पॅचवर्क डांबरीकरण करणे. २.०० लक्ष | विविध ठिकाणी पेव्हींग ब्लॉक बसविणेचे कामे करणे. २.०० लक्ष |

सुचक : सौ.विजया संजय बनकर अनुमोदक : श्री.संजय जगताप

मा.महापौर : विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.११ मधील कामासाठी तरतूदीत खालील दर्शविल्याप्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यास मान्यता देण्यांत येते.

| अ.क्र./पान क्र. | कामाचे नांव | सुधारीत कामाचे नांव |
|---|---|---|
| १८ डब्ल्यु-८७ डब्ल्यु-८९ | वॉर्ड क्र.११ कॉंक्रीट व पॅचवर्क डांबरीकरण करणे. २.०० लक्ष | विविध ठिकाणी पेव्हींग ब्लॉक बसविणेचे कामे करणे. २.०० लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३८२ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, मिटमिटा येथील गट नं.३०४ हा भाग नो डेव्हलपमेंट झोन मध्ये येतो, सदर भागात टाऊन प्लॅनिंग डिपार्टमेंट बांधकाम परवानगी देत नसल्यामुळे अशा ठिकाणी जमीनीचे मालक २०X३० चे भुखंड पाडुन विना परवानगी घरे बांधकाम करतात अशा पध्दतीला आळा घालणे गरजेचे आहे.

नाविकासित क्षेत्रात Auto L.P.G/.Gas Filling Station करीता नाहरकत प्रमाणपत्र देण्यासाठी सर्वसाधारण सभेच्या परवानगीने एन ओ सी देण्याबाबत महाराष्ट्र शासनाने एक ते दिड वर्षापूर्वी मनपास कळविलेले आहे. तरी सदर शासन निर्णयानुसार मिटमिटा गट नं.३०४ येथे Auto L.P.G/.Gas Filling Station साठी नाहरकत प्रमाणपत्र देण्याकरीता व मंजुरी करीता प्रस्ताव या सर्वसाधारण सभेसमोर देण्यात यावी ही विनंती.

सुचक : श्री.संजय रामदास जोशी,श्री.सीताराम सुरे अनुमोदक : श्री.संजय केनेकर

**संवाद :**

श्री.भगवान घडमोडे :२०X३० च्या जागेला परवानगी देता येत नाही सविस्तर माहितीसह ठेवावे.

मा.महापौर :हा विषय सविस्तर माहितीसह पुढील सभेत ठेवण्यात यावा.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव सविस्तर माहितीसह पूढील बैठकीत ठेवणेस मान्यता देण्यांत आली.

**विषय क्र. ३८३ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, जालना रोड ते मुकुंदवाडी गावात जाणाऱ्या चौकास ज्येष्ठ स्वातंत्र्य सेनानी स्व.कन्हैय्यासिंग हजारी यांचे नाव देण्याबाबत या भागातील नागरीकांची मागणी आहे.

करीता उपरोक्त चौकास ज्येष्ठ स्वातंत्र्य सेनानी स्व.कन्हैय्यासिंग हजारी यांचे नाव देण्यात यावे प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.बाबासाहेब डांगे अनुमोदक : श्री.बन्सीलाल गांगवे

मा.महापौर : विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जालना रोड ते मुकुंदवाडी गावात जाणाऱ्या चौकास ज्येष्ठ स्वातंत्र्य सेनानी स्व.कन्हैय्यासिंग हजारी यांचे नाव देण्यास मान्यता देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३८४ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, प्रभाग क्र.७० मधील विशालनगर येथील पेव्हर ब्लॉक बसविणेच्या कामाकरीता अर्थसंकल्प पान क्र.१५५/१३ नुसार र.रू.३.०० लक्षची तरतूद करण्यात आलेली आहे. परंतू सदर काम न करता या ऐवजी वार्ड क्र.७० विशालनगर येथे नाल्यातील मुख्य जलनि:सारण दुरूस्ती करणे या करीता र.रू.२.०० लक्ष ची तरतूद करून सदर कामाचे लेखाशिर्ष बदलण्यात यावे ही विनंती.

सुचक : श्री.विजय खुडे अनुमोदक : श्री.संतोष खेंडके

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.७० मधील विशालनगर येथील पेव्हर ब्लॉक बसविणेच्या कामाकरीता अर्थसंकल्प पान क्र.१५५/१३ नुसार र.रू.३.०० लक्षची तरतूद करण्यात आलेली आहे. परंतू सदर काम न करता **याऐवजी** वार्ड क्र.७० विशालनगर येथे नाल्यातील मुख्य जलनि:सारण दुरूस्ती करणे या करीता र.रू.२.०० लक्ष तरतूद वळती करणेस मान्यता देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

## ऐनवेळचे विषय

मा.महापौर : ऐनवेळचे प्रस्ताव आलेले आहे तेही मंजूर करण्यात येते.

**विषय क्र. ३८५ :**

मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिका कार्यक्षेत्रातील घनकचरा व्यवस्थापन पाहणीसाठी कॉमन वेल्थ लोकल गव्हरमेंट फोरम (C.L.G.F.) शिष्टमंडळाने नोव्हेंबर २००८ दरम्यान औरंगाबाद महानगरपालिकेस भेट दिलेली आहे.

सदर (C.L.G.F.) संस्थेच्या सभासदत्व नोंदणीसाठी विहित नमुन्यात अर्ज दाखल करणेस मा.महापौर आणि मा.आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद यांनी तत्वत: मान्यता दिलेली आहे. सदर संस्थेचे सभासद झाल्यानंतर घनकचरा व्यवस्थापनासाठी उच्च दर्जाच्या आंतरराष्ट्रीय तंत्रज्ञानाची सभासदांमध्ये आदान प्रदान संभवनीय आहे. त्याव्दारे महानगरपालिकेसाठी घनकचरा व्यवस्थापनासाठी अद्ययावत तंत्रज्ञान उपलब्धीचे नविन दालन उपलब्ध होणार आहे. सदर संस्थेच्या सभासदत्व नोंदणीसाठी ५४० पौंड म्हणजेस आदमासे रूपये ४३,२००/- एवढी नोंदणी शुल्क भरणा करणे आवश्यक आहे.

तरी उक्त नमुद प्रमाणे घनकचरा व्यवस्थापन क्षेत्रातील अद्ययावत तंत्रज्ञान महानगरपालिकेस मिळविण्याकरीता कॉमन वेल्थ लोकल गव्हरमेंट फोरम (C.L.G.F.) संस्थेकडील सभासदत्व नोंदणीस मंजुरीसाठी आणि सदर नोंदणीपोटी ५४० पौंड एवढे नोंदणी शुल्क भरणा करण्याच्या कार्यवाहीसाठीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, घनकचरा व्यवस्थापन क्षेत्रातील अद्ययावत तंत्रज्ञान महानगरपालिकेस मिळविण्याकरीता कॉमन वेल्थ लोकल गव्हरमेंट फोरम (C.L.G.F.) संस्थेकडील सभासदत्व नोंदणीस मंजुरीसाठी आणि सदर नोंदणीपोटी ५४० पौंड म्हणजेस आदमासे रू.४३,२००/- एवढे नोंदणी शुल्क भरणा करण्याच्या कार्यवाहीस मान्यता देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३८६ :**

अतिरीक्त शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मा.नगरसेविका श्रीमती खान मुमताज बेगम वाहेद खान,वार्ड क्र.४६ यांनी दिनांक ३१/१०/२००८ रोजी लेखाशिर्ष बदलाबाबत पत्र दिलेले आहे. मागणी नुसार खालील प्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहे की, प्रभाग क्रमांक ४६ अंतर्गत पुर्ण:डांबरीकरण करणे रक्कम रूपये ५.०० लक्ष पान क्र.डब्ल्युजीबी-१ अ.क्र.१० वर नमुद (अर्थ संकल्प पुस्तिका सन २००८-०९ च्या) या कामाऐवजी खालील प्रमाणे लेखाशिर्षक बदल वार्ड क्र.४६ अंतर्गत कॉंक्रेटींग करणे/दुरूस्ती करणे, ड्रेनेज लाईन दुरूस्त करणे,गटार दुरूस्ती, फरशी दुरूस्ती इत्यादी आवश्यकतेनुसार रक्कम रूपये ५.०० लक्षची फुटकळ कामे करणे (रक्कम रूपये ३०००/- ते २५०००/-पर्यंत) साठी वार्ड कार्यालय क जाफरगेट येथे वळती करणे. उपरोक्त प्रमाणे लेखाशिर्ष बदलाचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्रमांक ४६ अंतर्गत पुर्ण:डांबरीकरण करणे रक्कम रूपये ५.०० लक्ष पान क्र.डब्ल्युजीबी-१ अ.क्र.१० वर नमुद (अर्थ संकल्प पुस्तिका सन २००८-०९ च्या) **या कामाऐवजी** वार्ड क्र.४६ अंतर्गत कॉंक्रेटींग करणे/दुरूस्ती करणे, ड्रेनेज लाईन दुरूस्त करणे,गटार दुरूस्ती, फरशी दुरूस्ती इत्यादी आवश्यकतेनुसार रक्कम रूपये ५.०० लक्षची फुटकळ कामे करणे (रक्कम रूपये ३०००/- ते २५०००/-पर्यंत) साठी वार्ड कार्यालय क जाफरगेट येथे वळती करणेस मान्यता देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३८७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन २००८-०९ च्या अर्थसंकल्पात पाणी पुरवठा देखभाल दुरूस्ती या लेखाशिर्षाअंतर्गत एकुण रू.४०० लक्ष तरतुद उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. या पैकी स्पील कामांसाठी असलेली रूपये २३७.६५ लक्ष रक्कम वजा जाता नविन कामांसाठी रूपये १६२.३५ लक्ष रक्कम उपलब्ध होते. त्यातुन शहर पाणी पुरवठा भागांकरीता देखभाल दुरूस्तीसाठी एकत्रीत तरतुद रूपये ५४ लक्ष उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत. सदरील उपलब्ध तरतुद नोव्हेंबर २००८ अखेरीस संपलेली असल्यामुळे सद्यस्थितीत शहर उप विभागाअंतर्गत करावयाची दैनंदिन देखभाल दुरूस्तीची कामे करणे अडचणीचे होत आहे. पाणी पुरवठा शहर भागाची व्याप्ती व दैनंदिन देखभाल दुरूस्तीच्या कामांचे रूवरूप पाहाता मार्च २००९ अखेर पर्यंत या कामांसाठी तरतुद असणे गरजेचे व अत्यावश्यक आहे.करीता खालील प्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

१. अर्थसंकल्पातील देखभाल दुरूस्ती या लेखाशिर्षाअंतर्गत पृष्ठ क्र.W-७१ अ.क्र.८५ वर पाणी पुरवठा योजना इमारती व रस्ते दुरूस्ती या कामासाठी असलेली रक्कम रूपये १४.०० लक्ष एवढी तरतुद,मार्च २००९ अखेर पर्यंत खर्च होणार नसल्यामुळे ती तरतुद (रू.१४.०० लक्ष) पाणी पुरवठा शहर भागाकरीता एकत्रीत तरतुद म्हणून वळती करण्यात यावी.

२. सन २००८-०९ च्या अर्थसंकल्पात मा.स्थायी समितीने व मा.सर्वसाधारण सभेने ज्या नविन कामांची शिफारस केलेली आहे, ती रद्द करून त्या कामांची एकुण रक्कम रू.१३.३५ लक्ष एवढी तरतुद पाणी पुरवठा शहर भागाकरीता एकत्रीत तरतुद म्हणून वळती करण्यात यावी.

अशा रितीने उपरोक्त अ.क्र.१ व २ मध्ये नमुद रू.१४.०० लक्ष व रू.१३.३५ अशी एकुण रक्कम रू.२७.३५ लक्ष एवढी तरतुद पाणी पुरवठा शहर भागाकरीता एकत्रीत तरतुद म्हणून वळती करण्याची विनंती आहे. करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन २००८-०९ च्या अर्थसंकल्पात खालील प्रमाणे तरतूद वळती करणेस मान्यता देण्यांत येते.

१. अर्थसंकल्पातील देखभाल दुरूस्ती या लेखाशिर्षाअंतर्गत पृष्ठ क्र.W-७१ अ.क्र.८५ वर पाणी पुरवठा योजना इमारती व रस्ते दुरूस्ती या कामासाठी असलेली रक्कम रूपये १४.०० लक्ष एवढी तरतुद,मार्च २००९ अखेर पर्यंत खर्च होणार नसल्यामुळे ती तरतुद (रू.१४.०० लक्ष) पाणी पुरवठा शहर भागाकरीता एकत्रीत तरतुद म्हणून वळती करण्यात यावी.

२. सन २००८-०९ च्या अर्थसंकल्पात मा.स्थायी समितीने व मा.सर्वसाधारण सभेने ज्या नविन कामांची शिफारस केलेली आहे, ती रद्द करून त्या कामांची एकुण रक्कम रू.१३.३५ लक्ष एवढी तरतुद पाणी पुरवठा शहर भागाकरीता एकत्रीत तरतुद म्हणून वळती करण्यात यावी.

अशा रितीने उपरोक्त अ.क्र.१ व २ मध्ये नमुद रू.१४.०० लक्ष व रू.१३.३५ अशी एकुण रक्कम रू.२७.३५ लक्ष एवढी तरतुद पाणी पुरवठा शहर भागाकरीता एकत्रीत तरतुद वळती करणेस मान्यता देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३८८ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, माझ्या प्रभागातील पान क्र.-१६३ अ.क्र.३३ वरील टेनिस कोर्टाजवळ पेव्हर ब्लॉक टाकण्याचे काम असुन त्याऐवजी वार्ड क्र.७२ येथिल एच सेक्टर मध्ये ड्रेनेजलाईन चे काम करण्यात यावे ही विनंती.

सुचक : श्रीमती जयश्री सारंग किवळेकर    अनुमोदक : श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभागातील पान क्र.-१६३ अ.क्र.३३ वरील टेनिस कोर्टाजवळ पेव्हर ब्लॉक टाकण्याचे काम असुन **त्याऐवजी** वार्ड क्र.७२ येथिल एच सेक्टर मध्ये ड्रेनेजलाईन चे काम करण्यास मान्यता देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३८९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, खालील कामाचे लेखाशिर्षक बदलणे आवश्यक आहे त्यामुळे कृपया खालील प्रस्ताव मंजुर करण्यात यावा.

| जुने लेखाशिर्षक | नविन लेखाशिर्षक |
|---|---|
| प्रभाग क्र.७१ येथील उद्यानात विविध कामे करणे. पृ.क्र.१५५ अ.क्र.१७ तरतुद रक्कम २.५० लक्ष | प्रभाग क्र.७१ फॉरेस्ट कॉलनी येथे जलनिसारण वाहिनी टाकणे २.५० लक्ष |
| प्रभाग क्र.७१ चौंडेश्वरी कॉलनी येथे ढापे व पेव्हर ब्लॉक फिक्सींग करणे. पृ.क्र.१७० अ.क्र.१८ तरतुद रक्कम ३.०० लक्ष | प्रभाग क्र.७१ परिमल सो.कडे जाणाऱ्या रस्त्याचे कॉंक्रीट करणे. ३.०० लक्ष |

सुचक : श्री.संतोष खेंडके पाटील    अनुमोदक : श्री.सतिष कटकटे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, खालील कामाचे लेखाशिर्षक बदलणेस मान्यता देण्यांत येते.

| जुने लेखाशिर्षक | नविन लेखाशिर्षक |
|---|---|
| प्रभाग क्र.७१ येथील उद्यानात विविध कामे करणे. पृ.क्र.१५५ अ.क्र.१७ तरतुद रक्कम २.५० लक्ष | प्रभाग क्र.७१ फॉरेस्ट कॉलनी येथे जलनिसारण वाहिनी टाकणे २.५० लक्ष |
| प्रभाग क्र.७१ चौंडेश्वरी कॉलनी येथे ढापे व पेव्हर ब्लॉक फिक्सींग करणे. पृ.क्र.१७० अ.क्र.१८ तरतुद रक्कम ३.०० लक्ष | प्रभाग क्र.७१ परिमल सो.कडे जाणाऱ्या रस्त्याचे कॉंक्रीट करणे. ३.०० लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३९० :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, लेखाशिर्ष बदली करणे बाबत. पान क्र.१५६ अ.क्र.२१ माणकनगर वार्ड क्र.८४ येथील खुली जागा विकसीत करणे (बागा देखभाल दुरूस्ती) रक्कम रू.२.०० लाख **ऐवजी** वार्ड क्र.८४ अंतर्गत आर.बी.हील्स येथील रस्त्याचे डांबरीकरण करणे.

सुचक : श्री.शशांक दामोधर विसपुते

अनुमोदक : श्री.विजय किसनराव खुडे, श्री.नारायण तिलोकचंद कुचे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पान क्र.१५६ अ.क्र.२१ माणकनगर वार्ड क्र.८४ येथील खुली जागा विकसीत करणे (बागा देखभाल दुरूस्ती) रक्कम रू.२.०० लाख **ऐवजी** वार्ड क्र.८४ अंतर्गत आर.बी.हील्स येथील रस्त्याचे डांबरीकरण करणेस मान्यता देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३९१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिका वार्ड क्र.०७ मध्ये दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत असलेले निधीतुन विविध विकासाचे कामे १. रस्ते विकसीत करणे. २. ड्रेनेज लाईन टाकणे. ३. पाणी पुरवठा लाईन टाकणे. ४. विद्युतीकरण करणे या कामासाठी अंदाजे रक्कम रूपये १.२० कोटीचा खर्च अपेक्षीत असुन वार्ड क्र.०७ येथे दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत सदरील कामे करण्याचा प्रस्ताव मंजुर करून मा.जिल्हाधिकारी कार्यालयास पुढील कार्यवाहीस्तव पाठविण्यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.मिलींद दाभाडे, श्री.अ.साजेद अ.सत्तार        अनुमोदक : श्री.अशरफ मोतीवाला

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिका वार्ड क्र.०७ मध्ये दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत असलेले निधीतुन विविध विकासाचे कामे १. रस्ते विकसीत करणे. २. ड्रेनेज लाईन टाकणे. ३. पाणी पुरवठा लाईन टाकणे. ४. विद्युतीकरण करणे या कामासाठी अंदाजे रक्कम रूपये १.२० कोटीचा खर्च अपेक्षीत असुन वार्ड क्र.०७ येथे दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत सदरील कामे करण्यास व मा.जिल्हाधिकारी कार्यालयास पुढील कार्यवाहीस्तव पाठविण्यास मान्यता देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३९२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये वाचनालयात मागील सुमारे ०९-१० वर्षापासून दैनिक वेतनावर श्री.वाजेद खान मंसुरखान हे वाचनालयात सेवक/ग्रंथालय सहाय्यक म्हणून काम करतात. महानगरपालिकेचे खडकेश्वर,लोटाकारंजा, निजामोद्दीन दर्गा,असेफिया कॉलनी,मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्र, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र इत्यादी वाचनालयामध्ये कामाची अत्यंत आवश्यकता असल्याने तसेच त्यांनी एल.टी.सी.हा वाचनालयाशी संबंधीत अभ्यासक्रम पूर्ण केलेला असल्यामुळे, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड प्रकरण-३ चे नियम २ चे परिच्छेद २ मध्ये तरतुदीनुसार त्यांच्या शैक्षणिक पात्रतेच्या आधारे त्यांना महानगरपालिका अस्थापनेवरील मंजुर पदावर नियमित स्वरूपात मंजुर वेतनश्रेणीप्रमाणे महानगरपालिकेच्या कोणत्याही वाचनालयात कायमस्वरूपी नेमणूक करण्यात यावी. करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.सलीम खान यासीन खान        अनुमोदक : श्री.संजय जगताप

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये वाचनालयात मागील सुमारे ०९-१० वर्षापासून दैनिक वेतनावर श्री.वाजेद खान मंसुरखान हे सेवक/ग्रंथालय सहाय्यक म्हणून काम करत असल्यामूळे व महानगरपालिकेचे खडकेश्वर,लोटाकारंजा, निजामोद्दीन दर्गा,असेफिया कॉलनी,मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्र, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र इत्यादी

वाचनालयामध्ये कामाची अत्यंत आवश्यकता असल्याने तसेच त्यांनी एल.टी.सी.हा वाचनालयाशी संबंधीत अभ्यासक्रम पूर्ण केलेला असल्यामुळे, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड प्रकरण-३ चे नियम २ चे परिच्छेद २ मध्ये तरतुदीनुसार त्यांच्या शैक्षणिक पात्रतेच्या आधारे त्यांना महानगरपालिका अस्थापनेवरील मंजुर पदावर नियमित स्वरूपात मंजुर वेतनश्रेणीप्रमाणे महानगरपालिकेच्या कोणत्याही वाचनालयात कायमस्वरूपी नेमणूक करण्यास मान्यता देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३९३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत सन २००८-०९ या वर्षा करीता वार्ड क्रमांक -८०, अंबिकानगर-मुकुंदवाडी करीता अंतर्गत सिमेंट कॉंक्रेटीकरण करण्या करीता दलित वस्ती सुधार योजनेतून र.रू.४०,००,०००/-(अक्षरी रक्कम रूपये चाळीस लाख फक्त) मंजुर करण्यात यावेत.

करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

सुचक : श्री.नारायण तिलोकचंद कुचे, श्री.भगवान (बापू) घडमोडे

अनुमोदक : श्री.डॉ.भागवत कराड, श्री.प्रशांत देसरडा

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत सन २००८-०९ या वर्षा करीता वार्ड क्रमांक -८०, अंबिकानगर-मुकुंदवाडी करीता अंतर्गत सिमेंट कॉंक्रेटीकरण करण्या करीता दलित वस्ती सुधार योजनेतून र.रू.४०,००,०००/-(अक्षरी रक्कम रूपये चाळीस लाख फक्त) मान्यता देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३९४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत सन २००८-०९ या वर्षाकरीता कैलासनगर करीता अंतर्गत रस्ते डांबरीकरण करण्या करीता दलित वस्ती सुधार योजनेतून र.रू.२०,००,०००/- (अक्षरी रक्कम रूपये वीस लाख फक्त) मंजुर करण्यात यावेत.

करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

सुचक : सौ.सरला सखाराम पोळ अनुमोदक : श्री.डॉ.भागवत कराड, श्री.प्रशांत देसरडा

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत सन २००८-०९ या वर्षाकरीता कैलासनगर करीता अंतर्गत रस्ते डांबरीकरण करण्याकरीता दलित वस्ती सुधार योजनेतून र.रू.२०,००,०००/- (अक्षरी रक्कम रूपये वीस लाख फक्त) मान्यता देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३९५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिकेने ज्या ज्या वार्डामध्ये दररोज घंटागाडी जाते व तेथे नागरीकांना बकेटी देण्यात येणार आहे. अशा वसाहतीतील उघडयावर असलेल्या कचराकुंडया बंद करण्याची योजना महानगरपालिका राबवित आहे. या संदर्भात प्रस्ताव देण्यात येतो की, प्रभाग क्र.३५ कोतवालपुरा या वार्डातील गरमपाणी वसाहतीत असलेल्या आरोग्य केंद्रालगत उघडयावर कचराकुंडी आहे. तसेच महानगरपालिकेच्या पोहण्याच्या तलावाला जाण्याचा मुख्य रस्ता आहे. शिवाय तेथे मस्जिद हे धार्मिक स्थळही आहे. तेथील कचराकुंडी तुटलेल्या अवस्थेत असल्याने अनेक वेळा रस्त्यावर कचरा पसरलेला दिसतो. त्यामुळे स्वच्छता व साफसफाई राहत नाही व आरोग्यास हानीकारक आहे.

वरील सर्व बाबींचा विचार करता वार्ड क्र.३५ कोतवालपुरा येथील गरमपाणी वसाहतीतील आरोग्य केंद्रालगत असलेली कचराकुंडी बंद करून घंटागाडीव्दारे तेथे साफसफाई होत असल्याने त्या वसाहतीत कचरा साठविणेसाठी मिळकत धारकांना बकेटचे वाटप करण्यात यावे व तेथील

कचराकुंडी बंद करून स्वच्छता,साफसफाई व आरोग्य चांगले राहील यासाठी प्रयत्न करणे योग्य होईल, करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ सादर.

सुचक : श्री.सय्यद खुसरो सय्यद बुऱ्हानोद्दीन, श्री.गजानन बारवाल

अनुमोदक : श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर,श्री.डॉ.भागवत कराड,श्री.प्रशांत देसरडा, श्री.अ.साजेद अ.सत्तार

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.३५ कोतवालपुरा येथील गरमपाणी वसाहतीतील आरोग्य केंद्रालगत असलेली कचराकुंडी बंद करून घंटागाडीव्दारे तेथे साफसफाई होत असल्याने त्या वसाहतीत कचरा साठविणेसाठी मिळकत धारकांना बकेटचे वाटप करण्यास मान्यता देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३९६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.८९ सहकार नगर येथे लोककलादर्शन उद्यान विकसीत करणेचे काम प्रगतीपथावर असून सदर कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रू.४,४६,०००/- इतकी आहे.

तथापी सदर उद्यान परीपूर्ण विकसीत करणेसाठी अतिरिक्त निधीची आवश्यकता असल्याने या कामासाठी अर्थसंकल्प २००८-०९ मधील पान क्र.डब्ल्यु एस.सी-१५ वरील अ.क्र.१७ नुसार वार्ड क्र.८९ मधील खुली जागा विकसीत करणे रक्कम रू.७.०० लक्ष इतके वळती करण्यात येवून सध्या काम करत असलेले मुळ कंत्राटदार श्री.खुर्शिद हसन यांच्या मार्फत मुळ मंजूर निविदा दराने (१०.९९% कमी दर) वाढीव काम करून घेण्याचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजूरीस्तव सादर.

सुचक : श्री.सीताराम सुरे अनुमोदक : श्री.विजय खुडे,श्री.रवि गांगे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.८९ सहकार नगर येथे लोककलादर्शन उद्यान विकसीत करणेचे काम प्रगतीपथावर असून सदर कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रू.४,४६,०००/- इतकी असल्यामूळे, व सदर उद्यान परीपूर्ण विकसीत करणेसाठी अतिरिक्त निधीची आवश्यकता असल्याने या कामासाठी अर्थसंकल्प २००८-०९ मधील पान क्र.डब्ल्यु एस.सी-१५ वरील अ.क्र.१७ नुसार वार्ड क्र.८९ मधील खुली जागा विकसीत करणे रक्कम रू.७.०० लक्ष इतके वळती करण्यास आणि सध्या काम करत असलेले मुळ कंत्राटदार श्री.खुर्शिद हसन यांच्या मार्फत मुळ मंजूर निविदा दराने (१०.९९% कमी दर) वाढीव काम करून घेण्यास मान्यता देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

**नगर सचिव,**
महानगरपालिका औरंगाबाद